# प्रकरण तिसरे
# ‘ कंचनीचा महाल ’ मधील कवितांचे स्वरूप’


०१. प्रास्ताविक

०२. कंचनीचा महाल

०३. गिरिजेचा संसार

०४. नि:श्वास गीतावली

०५. जुईची कळी

०६. कंचनीचा महाल मधील कवितांचे रचनावैशिष्टये

०७. समारोप

संदर्भ ग्रंथ

# प्रकरण तिसरे
# ‘कंचनीचा महाल ’ मधील कवितांचे स्वरुप

## ०१. प्रास्ताविक :

कवी ना.घ. देशपांडे यांचा कथात्मक व नाटयात्मक स्वरुप असलेला ‘ कंचनीचा महाल ’ हा दीर्घकाव्यसंग्रह १९९६ ला प्रकाशित झाला असे असले तरी यात आलेल्या कविता लेखनाचा कालखंड १९३० पासून १९६३ पर्यंतचा आहे. ‘ कंचनीचा महाल ’ या काव्यसंग्रहात एकूण चार कविता आलेल्या आहेत. या चार कविता म्हणजे चार प्रसंगांचे वर्णन होय.

कविता विषय -

१. ‘ कंचनीचा महाल ’ - पौराणिक , कथात्मक , व्यक्तिगत स्वरुपाची कविता

२. ‘गिरिजेचा संसार’ - सामाजिक विषय असलेली व्यक्तिगत स्वरुपाची कविता

३. ‘निःश्वास गीतावली’ - कौटुंबिक स्वरुपाची कविता

४. ‘जुईची कळी’ - प्रेमकविता

अशाप्रकारे चारही कवितांचे विषय वेगवेगळ्या स्वरुपाचे आहेत. ‘ कंचनीचा महाल ’ या काव्यसंग्रहाचा अभ्यास करतांना कवितेतील आशय व स्वरुप कवितेच्या अनुक्रमाने पाहु या.

## ०२. कंचनीचा महाल :

ना.घ. देशपांडे यांनी या कवितेचे शीर्षकच काव्यसंग्रहाला दिलेले दिसते. “ कंचनीचा महाल ’ हे या काव्यसंग्रहाला नाव देण्यापूर्वी कवीच्या मनात या काव्यसंग्रहाला ‘ चौफुला ’ हे नाव द्यायचे असे ठरविलेले दिसते.”[१] पण नंतर मात्र त्यांनी ‘ कंचनीचा महाल ’ हेच नाव या काव्यसंग्रहाला निश्चित केल्याचे दिसते.

## २.१ कथाबीज :

'कंचनीचा महाल' या कवितेत एका तरुण कंचनीची कथा आलेली आहे. कंचनी म्हणजे कलावंतीण किंवा नायकीण होय. मेहकरच्या परिसरात कंचनी आणि तिने बांधलेला महाला बाबत एक दंतकथा प्रसिध्द आहे. "मेहकरच्या उत्तरेला पैनगंगेच्या काठी अर्धगोल टेकडीच्या एका भागात एक जूनी वास्तू आहे. तिलाच कंचनीचा महाल म्हणतात.[२]" या महालात कंचनी वास्तव्यास होती. स्वभावाने ती अतिशय अहंकारी होती. राजपुत्राची ती हृद्‌यहारिणी असली तरी ती त्याची कोणतीही गोष्ट ऐकण्यास तयार नव्हती . दंतकथेनुसार मेहकर परिसरात असलेल्या या महालामधून तिला २४ कि.मी. दूर असलेल्या लोणार सरोवरातील कमलजा देवीच्या मंदिरातील दिवा पाहण्याची अतोनात इच्छा होती. त्यासाठी तिने मजल्यावर मजले असे एकूण सात मजले बांधले. आता आपणाला दीप दिसणार अशा आनंदात ती सात मजले चढून वरच्या मजल्यावर पोहचली. तेथून तिला दिवा दिसल्याबरोबर आनंदमग्न अवस्थेत विभोर होऊन भान हरपल्याने ती मजल्यावरुन खाली पडली व तिची तेथे शिळा बनली. आजही ती तेथे शिळा होऊन पडलेली दिसते. 'कंचनीचा महाल' ही वास्तू सध्या भग्नावस्थेत आहे. फक्त खालच्या मजल्याचा काही भाग शिल्लक राहिलेला आहे. अशाप्रकारची ही एक दंतकथा आहे. ही दंतकथा कवी ना.घ. देशपांडे यांनी याच परिसरात ऐकलेली आहे. 'कंचनीचा महाल' या दीर्घकाव्यात हीच कंचनी रस्त्यावरुन जात असलेल्या वाटसरूला आपली करुण कहाणी सांगताना या कवितेत दिसते. नागपूर मधील मॉरिस कॉलेजच्या शारदा मंडळातील 'साहित्यसंग्रह' नावाच्या हस्तलिखितात या कवितेचा काही भाग यापूर्वी प्रसिध्द झालेला आहे.

## २.२ कंचनीचे वर्णन :

'कंचनीचा महाल' या कवितेत 'कंचनी' च्या साजशृंगाराचे वर्णन अतिशय सुंदररीत्या आलेले आहे. ही कंचनी स्वत:ला 'गणिका', 'यामिनी', 'दामिनी', 'स्वामिनी', 'हृदयहारिणी', लावण्यखाणी म्हणविते. स्वत: ती रुपगर्विता असल्याचे दिसते. रस्त्यावरुन

चालणाऱ्या वाटसरूला ती आपल्या सौंदर्याने भूरळ घालते व स्वत: एका राजसपुत्राची हृदयहारिणी असल्याचे ती सांगते.

' सुवेष धारिणी मी मनमोहक कुशल कंचनी होते;
मी एका राजाच्या राजस पुत्राची हृदयहारिणी होते.'

( कंचनीचा महाल, पृ. क्र. ३ )

वरील कडव्यातून कंचनी स्वत: लावण्यलता असल्याचे सांगते. यौवनाचा पूर, चंदनचर्चित अंग, गीतगंधाची राणी , कोमलकुसुमाहून , चंपकपुष्प ताजे या विशेषणातून कंचनीची नाजूकता, तारुण्य स्पष्ट होते. कवीने कंचनीचे केलेले वर्णन अतिशय मोहक वाटते.

## २.३ निसर्गवर्णन :

कवी ना. घ. देशपांडे आपल्या कवितेत निसर्गातील लीलया गुढता व्यक्त करतात. तसेच त्यांना निसर्गाविषयी अधिक ओढ असल्याचे दिसते. त्यांच्या या निसर्गाच्या ओढीबाबत कवीवर्य ना.धों. महानोर म्हणतात , " ना. घं. ना निसर्ग , नदीनाले , माणसं , शेतकरी जीवन ह्या विषयी खूप खूप आस्था प्रेम आहे. "[३] त्यांच्या कवितेत येणारा निसर्ग पाहता हे मत बरोबर असल्याचे दिसून येते.

' कंचनीचा महाल ' या कवितेत महालाचे वर्णन करीत असतांना आजूबाजूच्या निसर्गरम्य त्याचबरोबर भग्न परिसराचे देखील चित्रण येते. भग्नावस्थेत पडलेला कंचनीचा महाल, जवळच पैनगंगा नदीचे वाहणे , नि:शब्द मधूर अशी रात्र यातून निसर्गरुप साकारले जाते. पुनवेचे चांदणे, झुळूक, पिवळा निर्जन माळ , नीलार्द्र हवा , हिरवे केळीचे फड , सुगंधी वारे या प्रतिमांच्या साहाय्याने निसर्ग जीवंतपणे डोळ्यासमोर उभा राहतो. कवी वास्तवस्थितीत असलेला निसर्ग जशाचा तसा रेखाटतात. प्रसंगाबरोबर निसर्ग मार्गक्रमण करताना दिसतो. निसर्गातील घटकांचा वापर मनातील वेदना , खंत, आनंद व्यक्त करण्यासाठी कवी करतात. या कवितेत आलेला निसर्ग सहजरुपाने आल्याचे दिसते.

" अशीच होती रे नि:शब्द मधुर ती रात्र राजसवाणी;

असेच खोलांत वहात होते रे, या पैनगंगेचे पाणी।"

( कंचनीचा महाल , पृ. क्र. ३ )

वरील ओळीतून पैनगंगा नदी, तिचे खोलात पाणी वाहणे त्याचबरोबर नि:शब्द ,स्तब्ध अशी मधुर रात्र यातून निसर्गच प्रतित होतो. निसर्गातील निरामयता , निरागसपणा येथे प्रत्ययास येते. निसर्गाचे वर्णन करीत असताना कुठेही शब्दाची ओढाताण झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे कवितेत चित्रित झालेला निसर्ग मनाचा ठाव घेतो.

## २.४ अद्‌भूतरम्यता ( गूढता ) :

'कंचनीचा महाल ' या कवितेतील वातावरण अद्‌भूतलेला स्पर्श करते. या कवितेतील नायिका राजसपूत्राच्या प्रेमात रममाण न होता लोणार सरोवराच्या काठावर असलेल्या कमलजा देवीच्या मंदिरातील दीपक आपल्या महालामधून पाहण्याचे वेडे स्वप्न अंगी बाळगते . तिचा अलौकिकतेकडे लागलेला हा ध्यास अद्‌भूतता व्यक्त करतो. तिला या दिव्याची इतकी ओढ का लागावी हे केवळ तिलाच ठाऊक. यामुळे कवितेत गुढता निर्माण झालेली दिसते. उषा देशमुख अशा गुढतेबाबत, गुढगुंजन पर कवितेबाबत म्हणतात. " गुढगुंजन ही एक काव्यवृत्ती आहे. गुढ अनुभूती प्रगट करणारी ही वृत्ती आहे. कवितेत अन्तर्मुखतेने चाललेली आत्मशक्तीची विचारप्रक्रिया म्हणजे गुढगुंजनपर कविता असे म्हणता येईल. "[४]

' कंचनीचा महाल ' या कवितेत ' कंचनी ' अन्तर्मुख होऊन वेडावलेली दिसते. अस्तित्व संपल्यानंतरही स्वत:च्या अस्तित्वाबाबत सांगणारी कंचनी अद्‌भूत वाटते . ती म्हणते

" अंधाऱ्या रात्रीत ती सारी नगरी तमांत बुडतें , बाई।

मिटल्या दातांच्या ओसाड भिंती या बोलत का नाहीत काही

पुनव येताच वासनामय मी दगडांमधून येते :

महालाभोवती चांदण्याखालती तेच ते फेर मी घेते . "

( कंचनीचा महाल,पृ.क्र. ८ )

रात्रीच्या वेळेला आजूबाजूचा सर्व परिसर झोपी जात असून ओसाड भिंती देखील मिटल्या दाताप्रमाणे स्तब्ध होऊन राहतात. याचवेळेला आपण बंदिस्त असल्याचे कंचनी सांगते . मात्र पुनवेचा दिवस आला की, माझे वासनामय मन जागे होऊन मी दगडाबाहेर येते व महाला भोवती इच्छापूर्तीसाठी सारखे फेर घेते. येथे आपला आत्मा या दिवसात सारखा घिरट्या घालत असल्याचे कंचनी सूचित करते. येथे 'अंधारी रात्र ' ' ओसाड भिंती ' , 'दगडामधून प्रगट होणे', 'पौर्णिमेला महालाभोवती सारखे फेर घालणे' यातून अद्‌भूतता व्यक्त होते. वरील कडव्यात भितीदायक वातावरण निर्मिती होऊन परिसर गूढरम्य झाल्याचे दिसते. त्याचबरोबर या कवितेत कंचनीची शिळा होणे आणि तिने अतृप्त आत्म्याच्या रुपात भटकणे यातून 'कंचनीचा महाल' या काव्यकथेत अद्‌भुतता निर्माण होते.

## २.५ भावविव्हलता :

' कंचनीचा महाल 'या कवितेत कवी ना. घ. देशपांडे ' कंचनी ' या नर्तिकेच्या मनातील भावविव्हलता व्यक्त करतात. कंचनी स्वत:ला देवीपेक्षा श्रेष्ठ ठरविण्यासाठी एकावर एक अशी सात मजले बांधून त्यावरुन मंदिरातील दीपक पाहते व स्वत:च्या या ध्यासापायी आपला प्राण गमावून बसते. तिचा हा अलौकिक ध्यास वाखाणण्याजोगा असला तरी नंतर मात्र तिचे मन विव्हळताना दिसते. कवितेत आलेला कंचनीचा सुरवातीचा आवेश शेवटीला उतरलेला दिसतो. कधी तिचे मन उत्साहाने ओंसडून वाहते तर कवितेच्या मध्यातून कंपित झाल्यासारखे जाणवते. शेवटी मात्र तिचे दु:खी झालेले मन प्रकर्षाने जाणवते. शीळा होऊन पडलेली कंचनी आपल्या मनातील वेदना पथिकाजवळ कथन करते. त्याचबरोबर आपले विस्कटलेले मानस , वेडापिसा झालेला जीव, प्राप्त झालेले एकटेपण ती रस्त्यावरील वाटसरुला सांगते. आपला हव्यास आपल्यासाठी जीवघेणा ठरला. असा हव्यास करायला नको होता असे तिचे मत शेवटीला बनते. ती आपली दयनीय स्थिती सांगताना म्हणते -

' कशी रे , रंगवू आज मी राजसा , ते चित्र पुसटलेले :
पुनवरात्रीत माझे हे हिंडते मानस विस्कटलेले

दक्षिण दाराच्या बाहेर पडले अनेक शतके अशी;

पाषाणमय हें अचल जीवित सोसत आहे मी पिशी '

( कंचनीचा महाल , पृ. क्र. ८ )

वरील कडव्यात कंचनी आपले भूतकाळातील जीवनाचे चित्र पुसट झाले असून आपले मन विस्कटित झाल्याचे सांगते. त्याचबरोबर आपण महालाच्या दक्षिण दाराच्या बाहेर पाषाणरुपात अचल स्थितीत अनेक शतकांपासून असल्याचे कथन करते. चंचल स्वभावाची कंचनी अचल बनून राहल्याने त्या स्थितीत वेडीपिशी झाल्याचे ती पथिकाला सांगते. अशाप्रकारची वेदना आपण भोगत असल्याचे स्पष्ट करुन या वेदनेतून आपली कोणी मुक्तता करावी असे तिला वाटते. तेव्हा ती म्हणते -

' घुमतो पारवा , झोंबतो गारवा , वाऱ्यांत वाजते शिटी :

सहस्त्र भुजंग बळाने राजसा , एकच घाल रे मिठी।

( कंचनीचा महाल , पृ. क्र. ८ )

या ओसाड पडक्या महालात पारव्याचे घुमणे , अंगाला गार वारा झोंबणे अशी प्रतिकूल परिस्थिती जरी सभोवती असली तरी आपल्या राजसाने आपल्याला मिठी घालून या परिस्थितीतून आपली मुक्तता करावी अशी कंचनीची अपेक्षा आहे. वरील ओळीतून कंचनीची प्रीतीविषयीची ओढ अधिक असल्याचे दिसते. त्याचबरोबर या प्रीतीत वासनेचा गंध असल्याचे जाणवते. कडव्यात येणाऱ्या ' भुंजग ' या शब्दातून शृंगाररसाची निर्मिती होते. शेवटी प्रतिकूल परिस्थिती आपल्यासाठी अनुकूल होऊन आपली सुटका व्हावी अशी अपेक्षा बाळगणारी कंचनी येथे पाहायला मिळते.

## २.६ स्त्रीची विविध रुपे :

कवी ना.घ. देशपांडे यांच्या ' कंचनीचा महाल ' या कवितेत प्रामुख्याने ' कंचनी ' या रुपगर्विता तरुणीचे चित्रण आलेले दिसते. तिला तिच्या सौंदर्यावर गर्व निर्माण झाला आहे. त्यामुळे तिला आपल्यापेक्षा वरचढ असलेल्या गोष्टी अजिबात सहन होत नाहीत. म्हणूनच ती

लोणार सरोवरातील कमलजा देवीचे आपल्यापेक्षा असलेले श्रेष्ठत्व मान्य न करता तिच्या मंदिरातील दिवा आपल्या महालाची उंची वाढवून जागेवरुनच पाहु इच्छिते . येथे तिचा गर्विष्ठपणा व्यक्त होतो.

त्याचबरोबर जगाला भौतिक गोष्टी मिळविण्यासाठी लागलेला ध्यास व कंचनीला दिवा पाहण्याचा लागलेला ध्यास याच्यात खूप तफावत जाणवते. याच कंचनीबाबत मारुती चित्तमपल्ली आपल्या ' जंगलाचं देणं ' या पुस्तकात तिच्याविषयीचे मत व्यक्त करताना म्हणतात.

'' दीपवेडी ती. दिवा पहायला मिळावा म्हणून तिनं सर्वस्व वेचलं . जीवही घालविला. सारेजण पैशाच्या मागं धावत असतांना तिनं दिव्याचा ध्यास घ्याव हे त्या गावाचं भाग्य ''.[५]

अशाप्रकारचे वेगळेपण या कंचनीत दिसून येते. तहान भूकेपेक्षा , मायेच्या प्रीती पेक्षाही तिला त्या कमलजा देवीच्या मंदिरातील दिव्याचा ध्यास होता. त्याबाबत पथिकाला सांगताना कंचनी म्हणते -

' महालावर या बांधीत मजले ही वर कंचनी गेली :
तहान - भुकेची मायेची प्रीतोची नव्हती कदर केली '

( कंचनीचा महाल, पृ. क्र. ६ )

त्याचबरोबर

' मुळांत होते हे दोनच मजले : आणखी बांधले पाच
अनेक ज्योतिच्या भोवती झुलले झुंबरामधले काच ' (कंचनीचा महाल, पृ. क्र. ६)

दोन मजल्यावर अधिक पाच मजले बांधणे यातून तिची पुरुषाप्रमाणे केलेले कार्यकर्तृत्व स्पष्ट होते. तिची धिटाई या कवितेत पानोपानी व्यक्त झाल्याचे दिसते.

अशाप्रकारे या कवितेतून रुपगर्विता , अलौकिकाचा ध्यास मनी धरणारी व त्याच्या पुर्ततेसाठी कार्य करणारी ध्येयवेडी , स्वत:चे श्रेष्ठत्व सिध्द करु पाहणारी ' कंचनी ' या कवितेत दिसते. कवी ना. घ. देशपांडे यांनी ' कंचनीचा महाल ' या कवितेतून कंचनीचे वेगळेच स्वरूप रेखाटले आहे.

## ०३. गिरिजेचा संसार :

' कंचनाचा महाल ' या काव्यसंग्रहातील 'गिरीजेचा संसार ' ही दुसरी कविता असून सामाजिक विषयाला हात घालणारी आहे. त्याचबरोबर ती एक कौटुंबिक जीवनाची एक कहाणी सुध्दा आहे. ' गिरिजेचा संसार ' या कवितेला वास्तवाचा आधार आहे. या कवितेत असलेली नायिका ' गिरिजा ' ही संकटकाळात कवीच्या आजीच्या आश्रयाला आल्याचे कवी सांगतात. ही गोष्ट कवीने आपल्या आजीपासूनच ऐकली आहे.

### ३.१ कथाबीज :

गिरिजा ही एक वऱ्हाड प्रांतातील एक तरुणी होय. आपल्या जीवनात घडलेल्या छोट्याशा चुकीने इतर लोकात गैरसमज होऊन तिचे सांसारिक जीवन उद्ध्वस्त होते. अशी तिची करुण कहाणी या कवितेत येते. गिरिजा ही कितीही प्रामाणिक असली तरी तिला समाज वाईट मार्गाला लागलेली स्त्री म्हणून संबोधतो. तेव्हा स्वत:ची आत्मिक गरज म्हणून ती स्वत:हून अनैतिक मार्गाला जवळ करते. या कवितेत गिरिजा पथिकाला आपली करुण जीवन कहाणी निवेदन करते. गिरिजा ' निवेदक ' व पथिक हा 'श्रोता' असे या कवितेचे स्वरुप आहे.

### ३.२ निसर्गवर्णन :

' गिरिजेचा संसार ' या कवितेत रानाचे , पिकाचे वर्णन आलेले आहे. त्याचबरोबर चैत्र महिन्यातील रम्य वातावरण , श्रावणातल्या सरी , फुललेली वृक्षराजी यांच्या वर्णनातून निसर्गाबरोबरच गिरिजेच्या मनातील भाव व्यक्त होताना दिसतात. कवितेच्या पहिल्याच कडव्यात वऱ्हाड प्रांतातील विदर्भातील पिकांचे वर्णन येते.

' दाट पऱ्हाटी , लवलवणारी अन् रांगेन ऽ तूरी '

( गिरिजेचा संसार प्र. क्र. ११ )

पऱ्हाटी व तुरी ह्या वऱ्हाड प्रांतातील प्रमुख पिकांचा उल्लेख कवितेत कवीने देऊन त्या भागाचे वैशिष्ट्य रेखांकित केल्याचे दिसते. ' चैत्रामधला सुगंधी पहाटवारा ', ' पूर्वकडला शांत पहाटतारा', ' कळ्याफुलांनी सजलेली दरी ' या प्रतिमाच्या साहाय्याने कवी रसिक वाचकाच्या

डोळ्यासमोर निसर्गाचे रुप साकारताना दिसतो. ' गिरिजेचा संसार ' या कवितेतील निसर्ग हा प्रसंग पुढे सरकवण्यास साहाय्यक ठरताना दिसतो. कवितेतील वातावरण प्रसन्नमय होण्यासाठी निसर्ग सोबत करताना दिसतो. त्याच बरोबर निसर्गातून समृद्धी व्यक्त होताना दिसते.

' हिरवा पिवळा फुटला होता आंब्यावर मोहर :
निंबावरती होता ढवळा लवलवता फुल्वर
झुळुक लागतां लाजत होतं ऽ भुरकट पिवळं तन
फुलं ऽ तांबडी उधळत होतं ऽ पळसफुलाचं बन '

( गिरिजेचा संसार, पृ. क्र. १५ )

पळसफुलाचं बन , लवलवता फुल्वर , आंब्याचा मोहर , पिवळं तन यातून नाजूकता व्यक्त होते. त्याचबरोबर वरील कडव्यातून निसर्ग व गिरिजेचे मन यांच्यात साम्य साधल्याचे दिसते. बाहेरची वाऱ्याची झुळूक हळदीच्या पिवळ्या शरीराला लागून इंद्रियसंवेदना जागृत झाल्याचे जाणवते. या कवितेत कवी निसर्गातील सौंदर्य टिपताना दिसतो.

' भरभर घरट्याकडे सारख्या सांळुक्या धावल्या
झाकंड पडली : त्यात बुडाल्या झाडांच्या सावल्या '

(गिरिजेचा संसार, पृ. क्र. १८ )

येथे निसर्गातील पक्षी , प्राणी या घटकांचा वापर केल्याचे येथे दिसते . त्याचबरोबर निसर्गातील बदल दुपारचे - संध्याकाळ मध्ये झालेले रुपांतर झाडाच्या सावल्याच्या माध्यमातून सांगणे योजक स्वरुपाचे वाटते. ज्याप्रमाणे कवी आनंद निसर्गाच्या व्दारे व्यक्त करतो, त्याचबरोबर दु:खाचा पाढा पण याच निसर्गातून सांगताना दिसतो.

' विरुन गेला तूं वाऱ्यावर कलगीवरला तुरा
या खोलीच्या आराशीचा उजेड पडला सुना :
या पानांवर मधुर सुगंधी तसाच सुकला चुना . '

( गिरिजेचा संसार, पृ. क्र. २२ )

'कलगीवरला तुरा' , 'सुकला चुना' या प्रतिमा वापरुन कवी गिरिजेच्या अंत:करणातील दु:ख व्यक्त करतात. अशाप्रकारे निसर्गातून मानवी भाव भावना , उदासिनता , प्रसन्नता , आतुरता कवी व्यक्त करताना या कवितेत दिसतो.

## ३.३ कथाकाव्यातील पात्ररचना व त्यांचे स्वभाव रेखाटन :

' गिरिजेचा संसार ' या कवितेत प्रामुख्याने गिरिजा , तिची आई, तिचा पती , सुभी , सासरा व सासू अशी प्रमुख पात्रे व इतर येणारी पात्रे ही गौण आहेत. कवितेत पात्राचे आलेले वर्णन अतिशय सुबक असे आहे.

### अ) गिरिजा :

'गिरिजा ' ही या कवितेतील मुख्य पात्र होय. दिसायला ती सुंदर आहे. कथाबीज मध्ये गिरिजेचा अधिक उल्लेख येत असल्याने पुन्हा नव्याने तिचे वर्णन करणे येथे आवश्यक वाटत नाही. म्हणून ' गिरिजा ' या पात्राचा आपण येथे विचार करणार नाही.

### ब) गिरिजेची आई :

गिरिजेची आई खेड्यातील खेडवळ अशी साधी भोळी स्त्री आहे. स्वभावाने ती मायाळू वृत्तीची आहे. मात्र प्रसंगानुसार ती कठोर बनताना दिसते. आपली मुलगी ' गिरिजा ' शेतात कुण्या परक्या व्यक्तीशी बोलत असल्याचे तिला जेव्हा कळते तेव्हा ती आपल्या मुलीवर चांगलाच राग काढते. तेव्हा ती रागाने गिरिजेला उद्देशून म्हणते -

' सुंदर असली तरी धरावी कशी उराशी सुरी ?
बघू नयेशी मला वाटते पोर पोटची तरी .'

( गिरिजेचा संसार, पृ. क्र. १३ )

अशाप्रकारे वैर भावाने ती बोलत असली तरी त्यामागे तिची मुलीविषयी असलेली काळजीच व्यक्त होते. संतापाने बोलणारी ही आई मुलीला नवऱ्या घरी पाठवणीच्या दिवशी तेवढीच कोमलही बनते. आपल्या मुलीला तिच्या सासुने योग्यरीत्या सांभाळावे म्हणून ती विनंती करताना दिसते ती म्हणते -

‘ अजाण आहे पोर आणखी अनुभव आहे नवा
आईठायी तुम्हीच माझ्या बाळीला वागवा ’

( गिरिजेचा संसार, पृ. क्र. १५ )

अशाप्रकारची मुलीविषयी काळजी व्यक्त करणारी आई येथे दिसून येते. जेव्हा गिरिजा आपल्या सासरी नांदायला जाते तेव्हा गिरिजेची आई म्हातारी असून आपल्या पतीची व तिची भाकरी थापते . येथे तिचे पतीवर असलेले प्रेम व्यक्त होते. मरणापूर्वी ती गिरिजेच्या नावाचा सारखा ध्यास लावते. पण गिरिजा मात्र येऊ शकत नाही. गिरिजेच्या नावाचा सारखा जप तिच्यावरील प्रेमच दर्शविते. अशाप्रकारे गिरिजेची आई प्रेमळ , मायाळू दिसते. प्रसंगानुसार ती कठोर आहे. मात्र आतून प्रेमाचा ओलावा असणारी साधी भोळी आई कवितेतून व्यक्त होते.

**क) सुभी :**

‘ सुभी ’ ही गिरिजेच्या बाजूच्या गावची राहणारी मुलगी होय. ही सुभी एकदिवस गिरिजा व तिचा अल्लड सावळा शेजारी यांचे शेतातील बोलणे चोरुन ऐकते. काही वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर जेव्हा गिरिजा सुभीच्याच गावात नांदायला येते. तेव्हा ही सुभी पूर्वी ऐकलेले बोलणे तिच्या सासुला सांगून गिरिजेच्या संसाराची धूळधाण करते. गिरिजेची सासू तिला सवत आणून तिची हकालपट्टी करते व गिरिजेच्या सुखी संसाराचे स्वप्न येथेच भंग पावते. सुभीच्या या अविचारी कृत्याने गिरिजेचा संसार उद्‌ध्वस्त होतो. तिच्या संसार उद्‌ध्वस्त होण्यामागे सुभी हीच कारणीभूत ठरते. या कवितेतून सुभीचा अविचारीपणा , वाईट वृत्ती याचा प्रत्यय येतो.

**ड) गिरिजेचा पती :**

गिरिजेचा पती दिसायला सुंदर होता . तांबूस गौरवर्णी , गोल हसरा असा चेहरा , त्याचा होता. मात्र पतीकडून जे प्रेम अपेक्षित असते ते प्रेम तो गिरिजेला देत नव्हता . त्याचा पेहराव , त्याची घोडी , त्याचा लगाम वर्णन करण्यासारखा गिरिजेला वाटते. ती म्हणते -

'लगाम होता लाल नि त्यावर पिवळ्या मुंडावळी :

गंगथडीची घोडी होता सोडत भरमोकळी '

( गिरिजेचा संसार , पृ.क्र १७ )

अशाप्रकारचा त्याचा विशेष रुबाब व्यक्त होतो. गिरिजेचा तो पती असल्यातरी तिच्याशी उदासपणाने , परक्याप्रमाणे वावरतो. तो प्रत्येक गोष्ट आईने सांगितल्याप्रमाणे करतो. याचीच खंत गिरिजेला लागते व ती म्हणते -

' लाज कशाची सारं ऽ आता एकदाच सांगते :

त्याचं ऽ माझं ऽ नातं ऽ होतं ऽ देहापुरतं ऽ चं ते . '

( गिरिजेचा संसार, पृ. क्र. १७ )

शारीरिक प्रेमाव्यतिरिक्त अंतर्मनातील प्रेमाची व्यक्तीला गरज असते ते प्रेम गिरिजेला अपेक्षित आहे. ते प्रेम न मिळाल्याने ती स्वत:ला रंगमहालातील राखच मानते. 'गिरिजेचा संसार ' या कवितेत असलेला पती आपली पत्नी 'गिरिजा' हिच्या वर प्रेम न करणारा , तिच्यावर संशय घेणारा , तिच्याबद्दल अनास्था ठेवून तिला सवत आणणारा व स्वत:च्या लहानग्या मुलाचा काहीच विचार न करणारा अविचारी पुरुष केवळ स्वार्थी वृत्ती बाळगणारा असल्याचे दिसून येते.

**इ) नणंद :**

गिरिजेची नणंद हसमुख चेहऱ्याची , सडपातळ , गौरवर्णाची , नाकाने उत्तम , गळ्यात सोन्याची सरी असलेली , बोलण्यास मोकळी पण रागीट स्वभावाची कवितेत कवीने वर्णन केली आहे. स्वभावाने मोकळी असली तरी आपल्या सौंदर्यावर गर्व असलेली नणंद कवितेत चित्रित झाली आहे. तत्कालिन स्थितीत असलेली नणंद व या कवितेत आलेली नणंद यात साम्य दिसते. ती आपल्या वहिणीशी म्हणजेच गिरिजेशी हेवादावा करते. ती गिरिजेची बाजू न घेता आपल्या आईकडून सहभाग घेऊन घरात अधिक वाद निर्माण करताना दिसते. दिसायला जरी सुंदर असली तरी तिचे अद्याप लग्न झाले नाही असे वर्णन गिरिजा आपल्या नणंदेचे करते. यावरुन गिरिजेचा नणंदेचा अल्लड, खोडकर स्वभाव दिसून येतो.

## ई) सासू :

गिरिजेची सासू पुराण विचाराची असून तिचा पेहराव त्या विचाराला साजेसा असा आहे . ती गिरिजेचा अतोनात छळ करते. मात्र बाहेर सांगताना आपण आपल्या सुनेवर आईप्रमाणे प्रेम करीत असल्याचे सांगते अशाप्रकारची दुतर्फी भूमिका ती ठेवत असल्याचे दिसते. गिरिजा ही सुखरुप, सद्गुणी असली तरी केवळ पैशाच्या लालसेने ती तिला सवत आणते. गिरिजेची आई जेव्हा आजाराने त्रस्त होते , तेव्हा ती अंबाबाईचा कुळाचार पुढे करुन गिरिजेला माहेरी पाठवत नाही. यातून तिचा दुष्ट स्वभाव दिसून येतो.

घरात दुसरी सून आणल्यानंतर तिला गिरिजा नकोशी होते. तिला ती अपशकुनी , करंटी म्हणते . त्यात सुभी गिरिजेच्या कृत्याची तिच्याजवळ उजळणी करते त्यातून ती पूर्णत: रागाने पेटून उठते व गिरिजेला घराबाहेर कायमची हाकलून लावते. येथे गिरिजेच्या सासूचा कजाग स्वभाव दिसून येतो. ती गिरिजेला हाकलुन लावताना आपल्या लहानग्या नातवाचा देखील विचार न करता एका लहान मुलाला आईपासून कायमचे तोडताना ती दिसते. ‘ गिरिजेचा संसार ’ या कवितेत वर्णन केलेली गिरिजेची सासू ही स्वार्थी वृत्तीची , दृष्ट प्रवृत्तीची असल्याचे दिसते.

## उ) सासरा :

‘ गिरिजेचा संसार ’ या कवितेत आलेला सासरा साधा - भोळा शंकराप्रमाणे असल्याचे वर्णन गिरिजा करते. हातात सोन्याचे कडे , गळ्यात माळ , डोक्यावर तांबडे पागोटे असा त्याचा वेष असल्याचे दिसते. देवाच्या नामाचा जप करणे , सकाळ - संध्याकाळ भजन करणे, हा त्या व्यक्तीचा छंद असल्याचे गिरिजा सांगते. त्याच्या नित्यक्रमाचे वर्णन करतांना गिरिजा म्हणते -

‘ देवाजीचं ऽ नावं जपावं ऽ भजन करावं ऽ घरी
रामप्रहारी उठून होते वाचत ज्ञानेश्वरी
रोजचेच ते दूर जायचे शेतपहाणी वरी :
थकून होते येत पाहुण्या , सौसांजेला घरी ’. ( गिरिजेचा संसार पृ.क्र..१७ )

असे उत्तम चालत असले तरी घरात मात्र सासूपुढे आपल्या सासऱ्याचे काही एक चालत नसल्याचे गिरिजा स्पष्ट करते. आलेल्या वर्णनातून गिरिजेचा सासरा स्वभावाने मवाळ वृत्तीचा त्याचबरोबर विचाराने उत्तम प्रवृत्तीचा व्यक्ती असल्याचे आपणास सांगता येईल.

## ३.४ शृंगारवर्णन :

कवी ना. घ. देशपांडे ' गिरिजेचा संसार ' या कवितेत अंगावरील दागदागिने , अलंकार, कंकण या साजश्रृंगारांचे वर्णन करतात. त्याचबरोबर स्त्रीचे तारुण्य हा पण तिचा शृंगारच मानतात.

' पहिलं ऽ होतं ऽ रुप निराळं ऽ हे नव्हते दागिने :

शिणगाराला पुढे मागुती हे नव्हते आयने .'

( गिरिजेचा संसार पृ. क्र. ११ )

या ओळीत शृंगाराची संकल्पना बदललेली दिसते. दागदागिने अलंकार याचबरोबर त्या स्त्रीचे लावण्यमय रुप , तिची मोहक अदा , तिचे हास्य यांतून शृंगार निर्माण झाल्याचे दिसते. त्याचबरोबर

' तसंच तुही हांस पाहुण्या , मी आहे संगती :

हसून माझ्याकडे पहा : मी आहे मोहक मायावती .'

( गिरिजेचा संसार पृ.क्र. १६ )

येथे कवितेची नायिका ' गिरिजा ' स्वत:ला मोहकवती , लावण्यवती म्हणून घेते. तिच्या हालचालीत अदेत शृंगार भावना उद्‌पित झालेल्या दिसतात.

आपल्या सासुच्या साजशृंगाराचे वर्णन करताना गिरिजा म्हणते -

' पिंपळपानी मोठं ऽ कुंकू : नथेत होते खडे

अन्‌ पुतळ्याची माळ गळाभर : गर्द तांबडे चुडे '

( गिरिजेचा संसार पृ.क्र. १६ )

याचप्रमाणे गिरिजा नणंदेच्या साजशृंगाराचे वर्णन करते. तिने गळ्यात घातलेल्या ' सोनियाची सरी ' तिच्या लाडकेपणाचे , तारुण्याचे नाजूकपणाचे प्रतीक वाटते. गिरिजा तिच्या सासऱ्याचा

राहणीमानाचे वर्णन करते. हातात सोन्याचं कडे त्यांची श्रीमंती दर्शविते, गळ्यातील माळेतून साधी - सरळ स्वभावाची माणसं व्यक्त होतात. आणि डोक्यावर तांबडं पागोटे प्रौढत्वाचे, रुबाबदार व्यक्तिमत्वाचे प्रतीक वाटते. अशाप्रकारे साजात, मोहकवती चालीत, लावण्यरुपात, हालचालीत शृंगार प्रकर्षाने प्रतित झाल्याचे दिसून येते.

### ३.५ विवाह वर्णन :

'गिरिजेचा संसार' या कवितेत आलेले विवाह वर्णन महंदबेच्या 'धवळ्यांची' आठवण करुन देते. गिरिजेच्या विवाहाचे वर्णन कवी ना.घ. देशपांडे तपशिलवारपणे करतात. प्रसंगात आणलेली गतिमानता विवाह वर्णनात विशेष वाटते. पाल्हाळ त्याच्यात येत नाही. गिरिजेचे लग्न जुळले त्यानंतर देण्याघेण्याचे बोलणे झाले नंतर शालमुदी झाली आणि अशाप्रकारचे विवाहपूर्व औपचारिक कार्यक्रम आटोपल्यावर लग्नाचा दिवस येऊन ठेपला त्याचे वर्णन कवी सुबक करतात.-

'अखेर बाई झळकत उठली दैवाची चांदणी
अन् लगिनाची निरमळ चवथी आली शुभलक्षणी'

(गिरिजेचा संसार पृ. क्र. १४)

अशाप्रकारचे विवाहाच्या शुभघडीचे वर्णन केल्यानंतर वधू - वराच्या साजाचे, रुपाचे वर्णन कमी शब्दात कवी अतिशय उत्कटरित्या करतात.

'आंगणातला मांडव सजला : तोरण वर लावलं ऽ
वाजत गाजत सुगंधपाणी नवरीला घातल ऽ
हळद लावली आणिक माझी रंगवली पावलं ऽ
कपाळभर या सौभाग्याचं ऽ मळवट ही लावलं ऽ
उलट बांधली चोळी, होते मी नवरी देखणी
लाजत लाजत नीट नेसलें लाल नवी पैठणी

(गिरिजेचा संसार पृ. क्र. १४)

वरील वर्णन वाचताना रसिक वाचकाच्या डोळ्यासमोर विवाहाचे चित्र तरळू लागते. सगेसोयरे मांडवात जमून पिवळी अक्षता नवरी नवऱ्यावर टाकून शुभमंगल विवाह झाल्याचे सुचित होते. गिरिजेचा पाठवणीचा क्षण हृदयद्रावक वाटतो. या लग्नप्रसंगातून महाराष्ट्रातील लग्नपध्दती चित्रित होते. विवाहवर्णनाच्या मराठीत काव्यात मोजक्याच कविता आहेत. त्यात ही कविता लग्न वर्णनाच्या बाबतीत शोभून दिसल्यावाचून राहत नाही.

### ३.६ नियतीचा खेळ :

नियतीवर प्रभुत्व मिळविणारी अनेक लोक आपण समाजात पाहत असतो. त्याचबरोबर नियतीपुढे हतबल झालेली लोक पण आपणास दिसतात. नियती किंवा एखादा वाईट प्रसंग मनुष्याला सांगून त्याच्या जीवनात येत नाही. तेव्हा व्यक्तीला त्या प्रसंगाला सामोरे जाण्याशिवाय पर्याय राहत नाही. ' गिरिजेचा संसार ' या कवितेतील ' गिरिजा ' नावाच्या स्त्रीच्या जीवनात असाच प्रसंग घडतो. लग्नापूर्वी गिरिजा शेतात आपल्या तरुण शेजाऱ्याशी संवाद साधत असते. दोघांचे ते बोलणे बाजुच्या गावची सुभी नावाची स्त्री ऐकते. गिरिजा व तो अल्लड शेजारी यांच्यात काही संबंध असल्याचे समजून सुभी त्यावेळेला गप्प बसते. मात्र जेव्हा हिच गिरिजा सासर म्हणून तिच्याच गावात नांदायला येते. तेव्हा ही सुभी तिच्या सासूला वेगळेच काही सांगून गिरिजेच्या संसाराला आग लावण्याचे काम करते. पुढे सुभीच्या सांगण्यावरुन गिरिजेची सासू गिरिजेला घरातून कायमची हाकलून लावते व हिचा संसार उद्ध्वस्त होतो.

पतीवर अतोनात प्रेम करणारी , सासू - सासऱ्याचा मान राखणारी , आई वडिलांविषयी प्रेम असणारी , स्वत: पवित्र असलेली गिरिजा मात्र नियतीच्या ह्या खेळीमुळे शेवटी वेश्या व्यवसायाला बळी पडते. केवळ नियतीत बदल झाल्याने पावित्र्यमय असलेली गिरिजा अनैतिक मार्गाचा अवलंब करताना दिसते. शरीर जरी अपवित्र झाले तरी मन मात्र अजूनही पवित्र आहे. म्हणूनच अजूनही तिला आपल्या माधवची ( मुलाची ) आठवण आल्यावाचून राहत नाही.

## ३.७ पावित्र्य :

प्रेम ही मानव सुलभ बाब आहे. ते कधी , केव्हा , कुणावर होईल हे सांगता येत नाही. ' गिरिजेचा संसार ' या कवितेत गिरिजा लहानपणापासून आपल्या अल्लड शेजाऱ्याच्या सहवासात राहिल्याने त्याच्या प्रेमात पडते. पुढे दोघातही प्रेमभावना जागृत होते पण गिरिजेच्या लग्न शेजारच्या गावच्या श्रीमंत व्यक्तीशी जुळते. तेव्हा मात्र गिरिजा ह्या आपल्या अल्लड तरुण शेजाऱ्याची भेट घेणे सुध्दा नाकारते . जेव्हा एकदा त्यांची शेतात भेट होते तेव्हा ही आपल्या दोघांत संवाद होऊ नये अशी इच्छा व्यक्त करते. यावरुन तिचे शुध्द पवित्र मन व्यक्त होते. लग्न झाल्यानंतर ही गिरिजा आपल्या संसारात गृहिणी प्रमाणे रममाण होते. पतीशी ती एकनिष्ठतेने राहते. घरात सर्वाचा आदरसन्मान ठेवते. मात्र हिचे सासरचे लोक तिला मोलकरीण सारखी वागणूक देतात. सासू तिचा चांगलाच छळ करते. अशातच त्याच गावची सुभी हिच्या सासुशी उलट सुलट बोलून हिच्या संसारात कायमची ठिणगी टाकून जाते. गिरिजेची सासू पैश्याच्या लोभाने नवीन सवत तिला आणते व गिरिजेला घराबाहेर हाकलले जाते. तिच्या चारित्र्यावर ठपका ठेवला जातो. तेव्हा ती विनवून आपण निर्मळ असल्याचे सांगताना दिसते.

' नव्या पाहूण्या , मी तर होते निर्मळ गंगाजळ .'

( गिरिजेचा संसार,पृ. क्र. १२ )

पुढे ही गिरिजा नाईलाजास्तव वेश्या व्यवसायाकडे वळते. पण शरीराने जरी ती अपवित्र असली तरी मनाने मात्र ती पवित्रच आहे. या सर्व प्रकरणात आपली काहीच चुकी नसल्याचे ती वारंवार सांगते.

' उमजत नव्हतं मला आजवर म्हणून बसले मुकी :  
नव्हती माझी चुकी , सांगते , नव्हती माझी चुकी  
'आल्यानंतर इथेच शिकले इथल्या नवख्या रिती  
अमंगळाची मुळात नव्हती : गिरिजेला माहिती '

( गिरिजेचा संसार,पृ . क्र. २२ )

अशाप्रकारे स्वत: संबंधी स्पष्टीकरण देऊन अमंगळ बाबीची जराशी देखील आपल्याला जाणीव पूर्वी नसल्याचे ती सांगते व आपण पवित्र असल्याचे सांगते. समाजातील अशा गैरसमजामुळे आजही अनेक स्त्रिया कुमार्गाकडे वळलेल्या दिसतात. समाज या स्त्रियांकडे हीन दृष्टिने बघतो प्रत्यक्षात समाजातील विचारात दडलेल्या संकुचित प्रवृत्तीमुळे असे प्रसंग ओढवताना दिसतात असे आपणास सांगता येईल.

### ३.८ स्त्रीची विविध रुपे :

कवी ना. घ. देशपांडे यांनी आपल्या ' गिरिजेच्या संसार ' या कवितेत स्त्रीची विविध रूपे रेखाटली आहेत. व्यक्तीनुसार स्वभावात बदल होतो. एखादी व्यक्ती प्रेमळ तर तिच्याच सोबतीला असलेली व्यक्ती स्वभावाने रागीट असू शकते. या कवितेत येणारी प्रत्येक स्त्री वेगवेगळी रूप धारण करून समोर येते. कवितेत ' गिरिजा ' या स्त्रीचा प्रामाणिकपणा , पवित्रता, तर तिच्या आईचा मायाळूपणा असे स्वभावँदर्शन आपल्याला होते.

गिरिजा ही दिसायला ज्याप्रमाणे सोज्वळ, सुंदर आहे. त्याचप्रमाणे मनाने देखील निर्लेप , हळवी असल्याचे दिसते. ती आपल्या नवऱ्यावर, मुलावर , सासू - सासऱ्यावर प्रेम करणारी एक सामान्य गृहिणी असल्याचे दिसते. सुरुवातीला ती पावित्र्यमय जीवन जगते मात्र उत्तरार्धात तिला नाईलाजास्तव कुमार्ग स्वीकारावा लागतो. पण त्याच्यात तिचा काही एक दोष नसतो. तेच सांगताना ती म्हणते -

' कजाग सासू गर्जत होती : मी होते निर्बळ
बोलत नव्हते पण मी होते निर्मळ गंगाजळ . '

( गिरिजेचा संसार , पृ. क्र. २० )

अशाप्रकारे स्वत: गंगाजळाप्रमाणे निर्मळ असल्याचे विनवून सांगताना ती दिसते. येथे गिरिजा ही प्रामाणिक , प्रेमळ असल्याचे दिसते.

गिरिजेची आई प्रसंगानुरुप कठोर होत असली तरी मुळात मायाळू स्वभावाची स्त्री असल्याचे दिसून येते . तिचे गिरिजेवर खूप प्रेम आहे. तिची सासूने काळजी घ्यावी अशी

विनंती ती तिच्या सासूला करताना दिसते. मरणापूर्वी ती गिरिजेच्या भेटीसाठी आतूर होते. मात्र तिची भेट होत नाही. शेवटी मुलीच्या आठवणीतच तिला आपला प्राण सोडावा लागतो. तिच्या माध्यमातून आईचे प्रेमळरुप कवीने येथे रेखाटले आहे. गिरिजेची नणंद दिसायला सुंदर असली तरी स्वभावाने मात्र गर्विष्ठ अशी आहे. ती आपल्या मायाळू वहिणीला ( गिरिजेला ) मदत न करता नेहमी आईकडून भाग घेताना दिसते. खोडकरपणा , हेवेदावेपणा मनात बाळगणारी स्त्री म्हणजे गिरिजेची नणंद असल्याचे आपणास सांगता येईल. गिरिजेची सासू ही स्वभावाने खाष्ट अशी आहे. ती गिरिजेला दासीप्रमाणे वागणूक देते. सुभीच्या म्हणणे ऐकून ती गिरिजेला घरातून हाकलून लावते. एवढेच नव्हे तर गिरिजेला घरातून हाकलून लावण्यापूर्वीच आपली पैशाची लालसा पूर्ण करण्याकरीता , हुंडा मिळविण्याकरीता दुसरी सून घरात आणते. गिरिजा व तिचा लहानगा मुलगा यांच्यात कायमची फुट ती पाडते. अशाप्रकारे स्त्री जातीला कलंक वाटणारी तिची सासू आपल्याला या कवितेत पाहायला मिळते. केवळ पैशाला देव मानणारी स्त्री येथे सासूच्या रूपातून दिसते.

त्याचबरोबर गिरिजेचा संसाराला सुरुंग लावणारी सुभी दुष्कर्मवृत्तीची असल्याचे दिसते. ' सुभी ' ही गिरिजाचे लग्नापूर्वीचे शेजाऱ्याशी शेतातील बोलणे सासूला सांगून तिच्या संसारात हैदोस मांडते. त्याचाच परिणामी गिरिजेची सासू गिरिजेला घरातून हाकलून लावते. यातून सुभीचा अविचारीपणा दिसून येतो.

## ०४. नि:श्वास गीतावली ( विलापिका ) :

'नि:श्वास गीतावली ' ही कंचनीचा महाल ' या काव्यसंग्रहातील तिसरी महत्त्वपूर्ण अशी दीर्घकविता होय. कवी ना.घ. देशपांडे यांच्या वयाच्या नवव्या वर्षी म्हणजेच इ.स. १९१८ ला त्यांची आई मरण पावल्याने तेव्हापासून ते आईच्या प्रेमाला पारखे बनले. आई नसल्याचे दु:ख व आईची येणारी सतत आठवण यातून ही कविता बऱ्याच कालावधीनंतर मूर्तरुपास आली. ही कविता म्हणजे कवीचे आईविषयीचे शोकगीत होय. त्याचबरोबर ही

कविता एक विलापिका सुध्दा होय अत्यंत जिवलग व्यक्तीच्या निधनाने अथवा आत्यंतिक विरहाने झालेले दु:ख विलापिकेत आलेले असते. या कवितेत आईविना लहानग्या मुलाचा वियोग विरह, भग्ननिरास व्यक्त होत असल्याने ही कविता विलापिका ठरते.

**४.१ कथाबीज :**

' नि:श्वास गीतावली ' कविता म्हणजे एका लहानग्या मुलाचा आईविषयीचा शोक होय. या कवितेत एका लहान मुलाची आई मरण पावल्याने त्याला तिच्यापासूनचा विरह सहन करावा लागतो. आईच्या सोबतीला घालवलेला प्रत्येक क्षण त्याच्या स्मृतीत सारखा रेंगाळतो. मरणापूर्वी त्याला जवळ घेऊन तिने कुरवाळले व ' पुन्हा हे आपल्याला दिसतील का ? असे म्हणणे, दुसऱ्याच दिवशी त्या लहानग्या मुलाची आई अनंतात विलीन होणे हे सर्व प्रसंग तो विसरु शकत नाही. त्यातून ही कविता जन्म घेते. कवितेत लहान मुलगा आईला आळवताना दिसतो. तुझ्याशिवाय सर्वच व्यर्थ आहे असे म्हणतो. जेव्हा आई परत येत नाही तेव्हा तो तिच्यावर रागावतो. मुलगा आपली आई परत भेटावी म्हणून परमेश्वरापुढे विनवणी करतो तर कधी त्याच्याकडे न्यायाची भिक्षा मागतो. शेवटी पुनर्जन्मात तर भेट होईल ना ? अशी इच्छा व्यक्त करतो. अशाप्रकारचे कथानक या कवितेत आल्याचे दिसते. मूल व आई यांच्या प्रेमातील उत्कट ओढ व त्यातून निर्माण होणारी आशा - निराशा या कवितेत प्रामुख्याने आल्याचे आपणास दिसते.

**४.२ आईचा महिमा :**

कवी ना.घ. देशपांडे ' नि:श्वास गीतावली ' या कवितेतून आईची महत्ता स्पष्ट करताना दिसतात. या कवितेतील ओळी वाचतांना कवी यशवंताची ' आई ' कविता आठवते. 'आई' कवितेत आलेली ' स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी ' त्याचबरोबर माधव जुलियन यांची ' प्रेमस्वरुप आई वात्सल्यसिंधू आई ' याच तोडीची ओळ ' नि:श्वास गीतावली ' या कवितेत आलेली दिसते , ती अशी -

‘ तुझ्याविण या कोरड्या विश्वडोही जळे , माऊली ही मती मीनशी :

तुझ्याविण हा शून्य सारा पसारा , दिसे जीवजंजाळ हे राक्षसी .’

( नि:श्वास गीतावली , पृ.क्र. २७)

कवितेत झालेल्या या मुलाला आईविना हा संसार , पसारा शुन्य भासतो. यातून त्याचे आईवरील प्रेम व्यक्त होताना दिसते. त्याचबरोबर आईपुढे मौल्यवान वस्तूची किंमत कवडी इतकी ही नाही. हेच सांगताना तो लहानगा मुलगा म्हणतो -

‘ तुझ्याविण ही शून्य वाङ्मोहने गे , तुझ्यावीण ही शून्यशी नंदने;

तुझ्यावीण ही चंद्रिका शून्य झाली , तुझ्यावीण का ही उषा शोभणे ?

..........................................................

तुझ्यावीण ही शून्य आशा मनाची ; तुझ्यावीण शून्यसे राहणे .’

( नि:श्वास गीतावली , पृ. क्र. २८)

वरील कडव्यातून मुलाला आईविना चांदणे , चंद्रप्रकाश , उपवन , होणारी पहाट शून्य वाटते. एवढेच नव्हे तर या मुलाच्या मनातील आशा पण शून्यवत झाल्याचे दिसून येते. आईविना या जगात आपले अस्तित्व शून्याप्रमाणे असल्याचे हा मुलगा सांगतो. या मुलाला आईपुढे स्वर्णमोती मृत्तिकेचे ठसे वाटतात. यातून या मुलाचा आईवरील श्रध्दाभाव व्यक्त होतो. त्याला या अफाट सृष्टीत सर्वत्र आईचेच रुप विस्तारलेले , सामावलेले असल्याचे दिसते. तेव्हा तो म्हणतो -

‘इथे भोवती दिव्य सृष्टीत सारी जरी रंगली माऊलीची रुपे ,

रुचेना निशा वा उषा वा दिशाही जणू त्यातली मातृदेवी लपे !’

( नि:श्वास गीतावली , पृ. क्र. २८ )

निशा , उषा व दिशा यात या लहानग्या मुलाला आपल्या आईचे रुप प्रतिबिंबीत होतांना दिसते , यातच आपली मातृदेवी लपलेली आहे असे त्याला वाटते. यातून आईविषयीची या मुलाला लागलेली ओढच प्रकर्षाने जाणवते. या कवितेत आईची महती स्पष्ट झाल्याचे दिसते.

## ४.३ निसर्गवर्णन :

कवी ना. घ. देशपांडे यांनी आपल्या व्यक्तिगत जीवनातील विविध जाणिवा निसर्गाच्या साहाय्याने कवितेद्वारे व्यक्त केल्या आहेत. निसर्गाची रूपे जाणण्यासाठी कवी निसर्गाशी तादात्म्य पावतो. तादात्म्य पावल्यानंतर निसर्गातील रस, रूप, गंध, स्वाद या संवेदनाचा प्रत्यय घेऊन आपली कविता सादर करतो. निसर्गातील प्रतीकांचा आधार घेऊन कवी आपल्या मनातील खंत व्यक्त करतो. आई देवाघरी निघून गेल्याचे दु:ख कवी निसर्गाच्या माध्यमातून मांडतो. कवी म्हणतो,

'तधी सावळ्या जीवनाच्या प्रभाती उषेच्या निळ्या स्निग्ध तेजावरी
शुची, उज्वला निश्चला मातृमूर्ती किती शोभली सांध्य तारेपरी :
............................................................
पुढे लोपली तारका अंतराळी, उषा लोपली ना मनाला कळे :
मती गुंगली बाल्य संध्यातरंगी किती रंग ते आरूणी कोवळे !'

(नि:श्वास गीतावली,पृ.क्र.२५)

सावळ्या जीवनाच्या प्रभाती, निळ्या स्निग्ध तेजावरी, सांध्यतारेपरी, कोवळी माया, लोपली तारका इत्यादी निसर्गातील प्रतिमा, रूपके कवीने योजून आपल्या मनातील भाव कवितेत व्यक्त केला आहे. आपले दु:ख, आनंद, विरह व्यक्त करण्यासाठी कवीला निसर्ग जवळचा भासतो. निसर्गातील प्रत्येक घटक मानवी भावभावना प्रकट करण्यासाठी पुरेसा वाटतो.

'बघावे वरी तो निशा .... या कडव्यातील (पृ.क्र. २८) शब्दाशब्दांतून निसर्ग बहरलेला, फुललेला दिसतो. चांदण्या, कळ्या, वन, सौरभी, पक्षी गिरीकंदरी हे सर्व निसर्गातील घटक या कडव्यात अवतरतात. दिव्यता, व्यापकता, नाजूकता हे गुण जसे निसर्गात आढळतात. तसेच हे गुण मुलाला आपल्या आईत ही दिसतात. निसर्गाची व्यापकता, नाजूकता तिच्याही अंगी असल्याची मुलाला जाणीव होते. रात्र काळी, ढगाळी यातून कवीची उदासिनता सांगितली आहे. चंद्राची कोर, वारा, चांदणी, तेजोशलाका, काजळी यामिनी, श्रावणाच्या सरी इत्यादी

निसर्गातील घटकांमार्फत काव्यात विविध भाव उमटताना दिसतात. कवीने निसर्गातील दिव्यता त्याचबरोबर सूक्ष्मता जाणलेली आपणास दिसते. कवीला लहानपणापासून निसर्गाची ओढ असलेली दिसते. म्हणून त्याच्या काव्यात देखील भरभरून निसर्ग वर्णन आल्याचे दिसते.

### ४.४ आईच्या वात्सल्याची ओढ :

'निःश्वास गीतावली' या कवितेतील मुलगा लहान असताना आईचे निधन झाल्यामुळे तिचा सहवास त्याला कमी लाभला. मात्र स्मृतीरूपी ओढ मुलाला जास्त लागलेली दिसते. आपण आईविना पोरके आहोत हा पोरकेपणा नाहिसा करण्यासाठी या मुलाला आईचा सहवास हवा आहे. तिचे प्रत्यक्ष अस्तित्व प्रकट होण्यासाठी मुलगा जीवाचा आकांत करताना दिसतो. जगाची जाचणी सहन करण्यासाठी आईची माया गरजेची आहे. अशी भावना तो व्यक्त करतो. आईला आपली हाक कशी ऐकू येत नाही. आई निष्ठूर तर झाली नसेल ना ! अशाप्रकारचा सौम्य राग लहानशा मुलगा व्यक्त करतो. पण रागापेक्षाही त्याची आईविषयी ओढ, प्रेम प्रखरतेने जाणवते. आपले नेत्र आईला पाहण्यास आतुर झाल्याचे सांगून आईच्या छातीवर डोके ठेवून अश्रु ओघळून गूढ शांती अनुभवावी असे मुलाला सतत वाटते. आईच्या मिठीत विसावण्यास तो भूकेला असल्याचे दिसते.

'बघाया तुला तिष्ठले नेत्र दोन्ही, मिठी मारण्याला तसे हे कर;
रोमांचली सर्व माझी तनू ही : पुन्हा दे तुझा स्पर्श, माते तर !'

त्याचबरोबर,

'तुझे वक्ष मायेत हेलावतांना तिथे शीर्ष टेकून झोपेने मी;
तशा गूढ शांतीत होईल, गे, हा कधीचा मनस्ताप माझा कमी !

(निःश्वास गीतावली पृ.क्र. २७)

वरीलप्रमाणे मनातील आक्रोश शांत करण्यासाठी, मनाची होणारी तगमग, घालमेल दूर करण्यासाठी मुलाला आईचे वात्सल्यपूर्ण ऊर जवळचे वाटते. मुलाला आपली आई आजारी असल्याचा जेव्हा निरोप येतो तेव्हा हा लहानसा मुलगा तिच्या भेटीला जातो. कवीने आई-

मुलाची झालेल्या भेटीचा वर्णन केलेला प्रसंग हृदयाला पिळ पाडतो. तो म्हणतो,

'मला पाहता वीज अंगात आली तिच्या, हासली हाय वेड्यापरी !
तिचा दाटला कंठ अन् भेटण्याला मला क्षीणसे हात केले वरी.
धरूनी करी घट्ट लावी उराला, फिटे कापरा हात पाठीवरी
तसा कापरा ओठ लावी कपोला क्षणी चुंबिले एकदा नंतरी.'

(नि:श्वास गीतावली, पृ.क्र. ३१)

नंतर आईचे अस्तित्व नाहिसे झाल्यानंतर मुलाची अवस्था सैरभैर होते. तिच्या शिवाय अन्य कोणी नको आहे. तिचा जिव्हाळा, आपुलकी, माया, ममता, स्नेह याचा मुलाला आधार वाटतो व तोच आधार कायमचा दुरावल्याने मुलगा जळी, स्थळी, पाषाणी तिचा शोध घेण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसतो. उदा. पृ.क्र. ३३ वरील चौथ्या कडव्यात असा प्रयत्न केल्याचे दिसते. आईचे शरीररूपी अस्तित्व नाहिसे झाल्यामुळे आईची सावली नाहिशी झाल्याची खंत हा मुलगा व्यक्त करतो. जेव्हा ती भेटेल त्याचवेळी याच्या मनाला शांतता मिळेल व तो सर्वसुखी होईल असे तो म्हणतो.

'कधी सांग लाभेल शांती मनाला नि भेटेल का माऊली श्यामला'

(नि:श्वास गीतावली, पृ.क्र. ३४)

वरील ओळीत मुलगा स्वत:ला श्याम म्हणून घेताना दिसतो. येथे 'श्याम' नावाचे दोन अर्थ अभिप्रेत होतात. एक श्याम म्हणजे 'सावळा-कृष्ण' व दुसरा श्याम म्हणजे लहानपणचे सानेगुरूजी होत. 'श्याम' या शद्बाचे निघालेले दोन अर्थ कवितेचे सौंदर्य खुलवितात. आशय अधिक घन बनल्याचे येथे दिसते. अहोरात्र या मुलाचे आईविषयीचे चाललेले चिंतन, तिचेच डोळ्यांसमोर निर्माण होत असलेले भास यातून त्याची मातेविषयी असलेली वात्सल्याची ओढ दिसून येते. याच प्रकारची ओढ कवितेच्या पृ.क्र. ३५ वर 'तरीही अहोरात्र चित्तांत आई ..... या कडव्यात देखील आल्याचे दिसते.

अशाप्रकारे लहान मुलग्याला आपल्या आईबद्दल असणारी तीव्र ओढ व तिच्या जाण्याने त्याची झालेली व्याकूळ अवस्था कवी ना. घ. देशपांडे यांनी आपल्या कवितेत आर्ततापूर्ण, भावनिकपणे चित्रित केली आहे.

**०५. जुईची कळी :**

'जुईची कळी' ही कविता निसर्ग आणि प्रेम यांचा सुंदर संगम आहे. निसर्गातील रूपके, प्रतिमा योजून कवी प्रियकर-प्रेयसी यांच्या मनातील प्रेमभावना व्यक्त करतो. वाचकास ही कविता मोहवून टाकते.

**५.१ कथाबीज :**

'जुईची कळी' या कवितेत कवीने निसर्गाच्या माध्यमातून प्रेमाला वाचा फोडली आहे. ही कविता म्हणजे प्रियकर व प्रेयसी मधील संवाद होय. तो आपल्या प्रेयसीच्या प्रेमाची आळवणी घालतो. प्रेयसी त्याला कधी साद देते तर कधी मनात विभम्र निर्माण करते. तेव्हा प्रियकर तिला आपण एकत्र घालविलेला भूतकाळ आठविण्यास सांगतो व वर्तमानात आपल्या प्रेमाला साददेण्यास विनवणी करतो. या कवितेतील प्रियकर हा आपल्या प्रेयसीच्या प्रेमात आकंठ बुडून गेलेला आहे. त्यामुळे तिचा दुरावा त्याला सहन करणे दुरापास्त होऊन जाते. अशा आशयाची ही कविता आहे.

**५.२ निसर्गवर्णन :**

प्रियकर प्रेयसीला भूतकाळातील घटनाची आठवण करून देताना प्रसन्नमय व मुग्ध रात्रीचे वर्णन करतो व म्हणतो.

> 'प्रसन्न मुग्ध निशा, मुग्ध ही वृक्षही होते
> जुई मरंदमयी आणि मंदसंगीते' (जुईची कळी पृ.क्र. ३९)

येथे निशेचे वर्णन येऊन निसर्ग व प्रेम यांच्यात पुढे समन्वय साधला गेल्याचे दिसते. 'प्रसन्न मुग्ध निशा', 'मुग्ध वृक्ष', 'जुई', 'रजनी', 'प्रशांत समय', 'सुधेचा पूर' या उपमा प्रतिमांतून

निसर्गरूप सामोरे येते. 'निशा', 'जुई', 'वृक्ष', 'पूर' इत्यादी निसर्गातील घटकाचा वापर येथे दिसून येतो. 'चंद्र', 'वसंत ऋतू', 'निळे आभाळ', 'कलिका', 'विधुकोर' (चंद्रकोर), 'चकोर पक्षी', 'वरूण', 'रजनी', 'पुष्प', 'शशिप्रभा' या निसर्गातील घटकांच्या आधारे प्रियकर प्रेयसी यांच्यातील प्रेम कवीने व्यक्त केले आहे. प्रियकराची आळवणी, प्रेयसीचे रूसणे, उदासिनता निसर्गाच्या साहाय्याने उत्कटपणे कवी रेखाटतो. या कवितेत आलेला निसर्ग या कवितेचे अविभाज्य अंग बनल्याचे दिसते.

'प्रफुल्ल यौवन हे पण हसूं नकोस गर्वात् :

फुलून क्षणांत् हळूवार ही कळी सुकून जाईल: ' (जुईची कळी पृ.क्र. ४२)

येथे कवीने जीवन आणि निसर्ग यात साम्य साधले आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक कळी जशी सुकून जाते, तसेच यौवन सुध्दा कधीना कधीतरी नामशेष होते. असे जीवनातील सत्य या ओळीतून व्यक्त होते.

## ५.३ प्रेमाचा आठव :

'जुईची कळी' या कवितेत सुरूवातीलाच प्रियकर प्रेयसीला भूतकाळात असलेल्या प्रेमाची आठवण करून देतो. परस्पराविषयीचे आपले असलेले प्रेम, अडथळे असतानाही तिने दिलेला होकार, प्रियकराला कृष्ण व स्वत:ला राधा म्हणून घेतल्याचा प्रसंग प्रियकर हा प्रेयसीला आठवण करून देताना दिसतो. एकमेकांचे धुंदपणे प्रेमात रममाण होणे याचे वर्णन कवी उत्कटपणे करतो. प्रियकराला कृष्ण व प्रेयसीला राधा संबोधणे हे येथे विशेष वाटते. दोघासाठीही वापरलेली उपमा उचित असल्याचे दिसते. प्रेयसीचे प्रेम व्यक्त करतानांची धिटाई पाहण्यासारखी आहे.

**'भरून जुळी नयनें संथ पण धिटाईने**

**तरी पुन्हा अनुकार तूं दिला, दिला मीही'** (जुईची कळी, पृ. क्र. ३९)

एकमेकाला होकार दिल्यानंतर दोघातही एकमेकांविषयीच्या आकांक्षा अधिक वाढत गेल्यात. एकमेकाला दिलेली वचने, चंद्राला साक्षी ठेवणे यातून प्रीती अजून दृढ बनल्याचे दिसते.

'हवी तशी वचने तूं दिली मला तेव्हा

अजून वरून बघतो चंद्र हा जुना साक्षी' (जुईची कळी पृ.क्र. ३९)

अशाप्रकारे प्रियकर हा प्रेयसीला भूतकाळात घडून गेलेल्या प्रेमाचा आठव करून देताना येथे दिसतो.

## ५.४ प्रेमातील आतुरता :

'जुईची कळी' या कवितेतील प्रियकर आपल्या प्रेयसीला भूतकाळात असलेल्या आपल्या प्रेमाची आठवण करून देऊन आपल्या मनातील प्रेमाची आतुरता तिच्या समोर मांडतो. राधिका नावाने तो तिला साद घालतो. तिच्या भेटीसाठी प्रियकर अत्यंत व्याकूळ झालेला दिसतो. राधा व कृष्ण यांच्या प्रेमातील जी आतुरता होती. तिच आतुरता, तेच विशुध्द प्रेम प्रियकराच्या मनात असल्याचे कवी सांगतो.

'अशांत शान्त बसून मी किती बघावी वाट ?

अनंत अंत बघून नूर्जहां कधी होशील ?' (जुईची कळी, पृ. क्र. ४०)

अशांत आणि शांत या शद्बातून प्रियकराची मनाची गोंधळलेली स्थिती स्पष्ट होते. अशाही स्थितीत तो आपल्या प्रेयसीची आतुरतेने वाट पाहताना दिसतो. त्याचबरोबर आपल्या प्रेयसीला 'नूर्जहां' म्हणून ती कायमची आपली व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करतो.

## ५.५ प्रेमातील शंका :

प्रेम हे विश्वासाच्या वेलीवर फुललेले फुल असते. मात्र कधी कधी प्रेमाच्या आरशाला शंकेमुळे तडा जातो. प्रियकर किंवा प्रेयसीच्या मनात चुकचुकत असलेली संशयाची पाल त्यांचे प्रेम तुटण्यास कारणीभूत ठरते. अशी शंका आपल्या प्रेयसीच्या मनात राहू नये म्हणून प्रियकर तिला बोलते करून शंकेचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतो. तो म्हणतो,

'अढी परंतु नवी ही तुझ्या कपाळी कां ?

तरी जुळी भिवई अर्थगर्भ व्हावी का ?'

(जुईची कळी पृ. क्र. ४०)

येथे जुळी भिवई अर्थगर्भ होणे म्हणजे प्रेयसीच्या मनात शंका-कुशंका येणे होय. पुढे जाऊन मध्येच थबकणे, दुहेरी विचार मनात बाळगणे, कुरंग डोळे असणे, ठरलेल्या ठरावापासून परावृत्त होण्याचा प्रयत्न करणे. यातून प्रेयसीच्या मनातील प्रेमाबाबतची शंकाकुशंका लक्षात येते. शंकाकुशंकेने भरलेले मन हे एकमेकांत समरस होत नाही असे दिसून येते.

## ५.६ प्रेमाचे तत्त्वज्ञान :

'जुईची कळी' या कवितेत कवी ना. घ. देशपांडे प्रेमविरहीत जगाच्या स्थितीचे वर्णन करताना म्हणतात.

'सखे, अपूर्ण जगत् जर् नसेल जगांत् प्रीती
नसेल ममत्व, पहा, तर् कुठून बरे नीती ?
नि आंधळी ममता वाट् तुला मला दावील्'

(जुईची कळी पृ. क्र. ४१)

प्रेमाशिवाय जग अपूर्ण आहे. प्रेमातून ममत्व व ममत्वातून नीती निर्माण होते. नीती व ममत्व व्यक्तीच्या जीवन जगण्याला योग्य दिशा देण्याचे काम करते. हे प्रेमासंबंधीचे तत्त्वज्ञान प्रियकर त्याच्या प्रेयसीला पटवून देतो व उगाच कशाची ही चिंता करू नकोस असा उपदेश करतो. प्रेमाचे तत्त्वज्ञान कवी मार्मिक शद्बात अगदी सहजतेने सांगतो.

## ५.७ विरहभाव :

विरहवेदना ही भावना हा कवीच्या काव्याचा स्थायीभावच आहे. कवी ना. घ. देशपांडे यांच्या कवितेत विरहाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. 'जुईची कळी' या कवितेतील प्रियकर आपल्या प्रेयसीला भेटण्यासाठी सारखा आतुरलेला असतो. पण जेव्हा ती येण्यास विलंब करते तेव्हा याची व्याकुळता शिगेला पोहचते तेव्हा तो म्हणतो,

'कशा अखंड बघूं शून्य या दिशा चाऱ्ही ?
कशीतरी विरही कंठतो निशा सारी.

(जुईची कळी पृ. क्र. ४१)

त्याचबरोबर

'तुझा विभक्तपणा कोरडा असह्य अघोर :

त्वदर्थ अंध उभा मी तुझा तृषार्त चकोर' (जुईची कळी पृ. क्र. ४१)

वरील चारही ओळीतून प्रेयसीला चारही दिशेत शोधणारा, रात्रभर तिच्यात विरहात स्वत:ला जाळणारा, चकोर पक्ष्याप्रमाणे भेटीसाठी व्याकूळ होणारा प्रियकर दिसतो. प्रियकराला आपल्या प्रेयसीच्या विरह असह्य होताना दिसतो. दोघांतील विभक्तपणा दोघांनाही वेदना देणारा ठरतो. असे कवीला सुचवायचे आहे. येथे प्रियकरासाठी वापरलेली चकोर ही उपमा उचित असल्याचे दिसून येते.

## ५.८ मुक प्रेम :

प्रियकर प्रेयसीला बाहेरच्या व्यवहारी जगाची जाणीव करून देतो. बाहेरच्या जगात चालत असलेल्या गोंधळाचा परिणाम सर्वत्र दिसत आहे. अशा या जगात प्रेयसीचे गोंधळणे, कंटाळा येणे स्वाभाविक आहे. प्रेमाच्या बाबतीत जेव्हा अशी स्थिती निर्माण होते, तेव्हा प्रियकर तिला निवांतपणात बसून तिच्या मनातील मुकी अशद्व लकेर ऐकण्यास सांगतो.

'बसून अशा सुजनांत् तूं किती सहावास् शीण ?

मनांत निवांतपणात् ऐक मुकी अशद्व लकेर् (जुईची कळी पृ. क्र. ४२)

अशा निवांतपणात बसल्यानंतर जाणीव झालेलं मुक्त प्रेम प्रियकर प्रेयसीला व्यक्त करण्यास सांगतो. शुध्द दडलेल्या प्रेमाची जाणीव झाल्यानंतर माझ्या प्रेमाची महती तुला पटेल असे प्रियकर तिला म्हणतो. शेवटी कवी अंतर्मनात असलेल्या प्रेमाला उजाळा देऊन प्रेमाचे गीत गायले जावे अशी इच्छा व्यक्त करतो.

## ५.९ प्रेयसीचे वर्णन :

'जुईची कळी' या कवितेत प्रेयसीचे वर्णन कवीने उत्कटतेने केले आहे. प्रेयसीला प्रियकराची राधा म्हणून संबोधले आहे. त्याचबरोबर 'नूर्जहां', 'गिरिजा', 'भिल्लिण' म्हणून तिचे वर्णन केले आहे. आपल्या प्रेयसीचे डोळे, नासिका व तिचे प्रेम बघून प्रियकर तिला सुंदर

असल्याचे सांगतो. तो तिला म्हणतो,

'बघून तुझी नयने, नासिका बघून नामी,
बघून तुझी ममता चारूता म्हणालों मी,
जणू अनंग धनू ; वाकवूं नको भुवया
गडे तुला गिरिजा भिल्लिणी म्हणूं का मी ?''

(जुईची कळी, पृ.क्र. ४२)

येथे प्रियकर प्रेयसीला 'गिरिजा भिल्लिणी' ची उपमा देताना दिसतो. मात्र वरील कडव्यात आलेला 'ममता' हा शद्ब योग्य वाटत नाही. कारण ममता ही आईविषयीची असते. प्रेयसीबाबत 'ममता' ह्या शद्बाचा वापर कवीने केला असला तरी तो चुकीचा वाटतो.

**५.१० सहवासातील धुंदी :**

सहवास हा प्रियकर-प्रेयसी दोघानाही हवाहवासा वाटत असतो. जेव्हा त्यांना एकमेकांचा सहवास लाभतो तेव्हा त्यांना इतर गोष्टीचे भान उरत नाही. त्यांच्यात एकप्रकारची धुंदी चढत जाते. ही सहवासाची धुंदी कवी पुढीलप्रमाणे अतिशय उत्कटतेने मांडतो.

'निळी निळी रजनी : भोवती रूपेरी धूर
तिने भरून सुरई वर्षला सुधेचा पूर
पिऊन तशी मदिरा धुंद तर्र होतो मी;
सदैव शांत तरी धुंदला तुझाही नूर'

(जुईची कळी पृ. क्र. ३९)

अशा सहवासातून प्रेम अधिकच गहिरे होण्यास मदत होते त्यातून प्रेमभावना वाढीस लागते. असे म्हणता येईल.

**५.११ समर्पणशील वृत्ती :**

प्रेम हे त्यागात असते, भोगात नव्हे असे असले तरी समर्पणशील वृत्तीत खरे प्रेम दृढ होण्यास मदत होते. 'जुईची कळी' या कवितेत प्रेयसी आपल्या प्रियकराला सर्वस्व बहाल

करताना दिसते ती म्हणते -

'पसंत कृष्ण तुम्ही, मी गडे सखी राधा !' (पृ.क्रं. ३९)

येथे ती त्याला आपलं सर्वस्व मानत असल्याने त्याला ती स्वत:ला अर्पण करण्यास तयार आहे. तसेच पृ. क्र. ३९ मधील तिसऱ्या कडव्यात जीवनात कितीही अडथळे आले तरी मी तुला सोबत देईन असे प्रेयसीचे प्रियकराला म्हणणे हे समर्पणशील वृत्तीचे प्रातिनिधीक आहे. प्रेयसीप्रमाणेच हा प्रियकर देखील समर्पणवृत्ती मनी बाळगून असल्याचे दिसतो व म्हणतो-

'बघून तुझे गहिरे हे कुरंग डोळे दोन्
पटून ममत्व तुझें मी दिले जिवांचे होन्.'

(जुईची कळी पृ. क्र. ४१)

होन म्हणजे एकप्रकारचे महत्त्वपूर्ण नाणे होय. येथे जिवाचे होन् म्हणजे जीवातील सर्वस्व होय. समर्पणशील वृत्ती प्रेम वाढीस चालना देते त्यातून प्रेम वृद्धिंगत होते. म्हणून समर्पणशील वृत्ती प्रेमात असणे ही महत्त्वाची बाब ठरत असते.

### ५.१२ स्त्रीची विविध रूपे :

'नि:श्वास गीतावली' या कवितेत आईचे रूप चित्रित होऊन तिच्याविषयक भावभावना व्यक्त झाल्या आहेत. कवितेतील मुलाला आपल्या वयाच्या नवव्या वर्षी मातृशोकाला सामोरे जावे लागले. त्याची वेदना या मुलाच्या अंत:करणाला कायमची लागलेली आहे. हाच मुलगा मोठा झाल्यानंतर आईची स्मृतिरूपाने आठवण काढत राहतो. आपली व आईची आजोळी होणारी भेट त्याच्या कायमची आठवणीत राहते. असेच एकदा आई आजारी असताना या मुलाला भेटीला बोलावले जाते. तेव्हा हा मुलगा आपल्या आईच्या भेटीला जातो. आजारी असलेली आई त्याला व त्याच्या इतर भावंडांना बोलविते व जवळ करते. त्यावेळी तिला आपले मरण जवळ दिसत असावे म्हणून ती आपल्या आईला या मुलांचा सांभाळ करावा अशी आर्जव करते. ती आर्त हाक हृदयाला कारूण्यमय साद घालते. ती आपल्या आईला उद्देशून म्हणते -

"कधी गे पुन्हा भेट होईल यांची मला जाळते आत कांहीतरी"

(नि:श्वास गीतावली पृ.क्र. ३१)

असे उद्गार तिच्या तोंडून निघतात व तिच्या नेत्रातून अश्रू ओघळू लागतात. तिच्या अंत:करणातील एक आईची वेदना दुसरी आई जाणू शकेल अशी आहे.

"रडूं लागली दीन केविलवाणी बघूं लागली माय माझ्याकडे

दिसू लागली काळजी अंतरीची - नको रे, बघूं मानसा त्याकडे.

(नि:श्वास गीतावली पृ.क्र. ३१)

तिचे ते मुलाकडे केविलवाणे बघणे आपले प्राण सुटू नये असे इच्छित दर्शविणारे आहे. जगात आपल्या मुलांना सोडून मरणाचा स्वीकार करणे, ही कोणत्याच आईच्या मनाला सहन न होणारी गोष्ट आहे. आईचं मन कवीने उत्कटतेने उलगडले आहे. ही कविता आई व मुलाचे उत्कट भाव व्यक्त करण्यात यशस्वी ठरते. आईची ममता, प्रेम येथे व्यक्त होते.

## ०६. 'कंचनीचा महाल' मधील कवितांचे रचनावैशिष्ट्ये :

### ६.१ कवितांच्या रचनेचे स्वरूप :

'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात एकूण चार कविता असून त्या आकाराने दीर्घस्वरूपाच्या आहेत. कवी ना. घ. देशपांडे यांनी आपल्या मनात बऱ्याच कालावधीपासून रूजलेले ऐकीव कथानक घेऊन त्याची दीर्घकाव्यात निर्मिती केली आहे. या काव्यसंग्रहात येणाऱ्या प्रत्येक कवितेत एखादी घटना प्रारंभापासून शेवटपर्यंत चित्रित केली आहे. पहिली कविता 'कंचनीचा महाल' या नावाची असून ती एकूण १४० ओळीची बनली आहे. 'गिरिजेचा संसार' ही कविता २९२ ओळीची, 'नि:श्वास गीतावली' एकूण २७० ओळीची तर 'जुईची कळी' ही कविता ९६ ओळीची बनली आहे.

या काव्यसंग्रहातील कविता दीर्घ असल्यातरी त्यात ओळीचे पुनश्चीकरण किंवा तोचतोचपणा आलेला नाही. हे या कवितेचे विशेष म्हणावे लागेल. पहिल्या तीन कवितेच्या

प्रत्येक कडव्यात साधारणत: १०-१० ओळी आलेल्या आहेत तर काही कवितेत १० ओळीचे कडवे संपल्यानंतर लगेच दोन ओळीचे कडवे पाठोपाठ येते. तर 'जुईची कळी' या कवितेत चार-चार ओळीचे कडवे प्रामुख्याने आलेले आहेत. अर्थातील सहसंबंध तुटू नये म्हणून दोन कडवे आठ-आठ ओळीचे आलेले आहेत. एका कडव्याचा दुसऱ्या कडव्याशी संबंध जुळवत कविता पुढे-पुढे सरकत जाते व त्यातून एक दीर्घकाव्य निर्माण होते. कविता दीर्घ असल्यातरी पाल्हाळ जाणीवपूर्वक टाळल्याने 'कंचनीचा महाल' काव्यसंग्रहातील कविता रोचक बनल्या आहेत. कविता संपल्यानंतर कवीने कवितेचा लेखनकाळ अंदाजे १९२९ ते १९६३ पर्यंतचा नमूद केला आहे. कविता समजून घेण्यासाठी तो लेखनकाळ महत्त्वाचा वाटतो.

## ६.२ 'कंचनीचा महाल' या शीर्षकाची अन्वर्थकता :

'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात एकूण चार दीर्घ कवितांचा समावेश झाला आहे. या कवितांचे विषय वेगवेगळे असले तरी या चारही कवितेत स्त्री वर्णन आल्याचे दिसते. या काव्यसंग्रहातील पहिल्या कवितेत कंचनीचे दु:ख व्यक्त झाले आहे. 'गिरिजेचा संसार' या दुसऱ्या कवितेत सांसारिक गिरिजेचे दु:ख आलेले आहे. 'नि:श्वास गीतावली' या कवितेतून आईचे हृदयस्पर्शी मन व्यक्त झाले आहे. मुलांना सोडून देवाघरी जाणे तिला असह्य होताना दिसते. चौथ्या 'जुईची कळी' या कवितेत प्रेयसीचे प्रेमविषयक वर्णन आलेले आहे. पूर्ण कवितेत प्रेयसीच्या मनात कुठेतरी खंत असल्याचे जाणवते. या चारही कवितांचा विचार करता या स्त्री कविता दु:खाने भरलेल्या जाणवतात. या चार कवितेत 'कंचनीचा महाल' ही कविता थोडी वेगळेपण दर्शविणारी आहे. 'कंचनीचा महाल' या शद्बांत गूढ दडलेले वाटते. या काव्यसंग्रहाला शीर्षक देतांना 'कंचनीचा महाल' हे नाव कवीला रम्य वाटले असावे. या कवितेत आलेले अद्भूतरम्य रूप बघून 'कंचनीचा महाल' हेच शीर्षक कवीला उचित वाटले असावे असे म्हणता येईल किंवा 'कंचनीचा महाल' ही कविता या काव्यसंग्रहात अनुक्रमाने पहिली येत असल्याने इतर अन्य नाव देण्यापेक्षा त्यांना या कवितेचेच नाव काव्यसंग्रहाला देणे योग्य वाटले असावे. म्हणून त्यांनी 'कंचनीचा महाल' हे नाव या काव्य संग्रहाला दिले असे म्हणणे योग्य ठरते.

## ६.३ अलंकार वैभव :

अभिव्यक्तीच्या दृष्टीने अलंकाराचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. अलंकारामुळे कवितेला साज येतो. त्याचबरोबर कवीची अभिव्यक्ती अधिक स्पष्ट होते. भाषेला सौष्ठत्व प्राप्त होते. अलंकाराच्या योग्य वापरामुळे सौंदर्याची खुलावट अधिक होते. कवी ना. घ. देशपांडे याची शद्बकला अलंकारानी नटलेली अशी आहे. यमकाबरोबर अनुप्रास, उपमा, रूपक, वृत्ते, जाती व विविध रसाचा वापर कवीने कवितेत केलेला दिसून येतो. त्याचा सविस्तर अभ्यास खालीलप्रमाणे करता येईल.

### अ) यमक :

ना. घ. देशपांडे यांच्या प्रत्येक कवितेत, प्रत्येक कडव्यात नव्हे तर प्रत्येक दोन ओळीत यमक साधल्याचे दिसून येते. यमकांशिवाय या कवितांचा विचार करणे शक्यच नाही. कवीच्या कवितेत येणारे यमक हे ओढून ताणून आणल्याचे दिसत नाहीत. तर ते सहजतेने आलेले आपणाला दिसतील. कवितांमध्ये सर्व ठिकाणी अत्यंयमक साधले आहे. यमकाचा दुसरा प्रकार 'दामयमक' याचा जास्त वापर झालेला दिसून येतो.

१) स्वराचे साधर्म्य दाखविणारे यमक पुढील शद्बांद्वारे साधले आहे. उदा. सूर-पूर, जागे-धागे, माळ-ताल, पुढे-चुडे, तारे-वारे, पाच-काच, कढ-फड, धापा-टापा, धूर-सूर, थोर-पोर, माथी-साथी, वेळ-खेळ, माज-सांज, ताजे-माझे इत्यादी (कंचनीचा महाल).

२) धुरे-तुरे, तुरी-पुरी, वाटलं-धाटलं, लागली-लाजली, ऐकलं-पाहयलं, उभी-सुभी, मळा-कळा, असं-पिसं, हासरी-नाचरी, गडू-रडू, देखणी-पैठणी, हसू-पुसू इत्यादी (गिरीजेचा संसार)

३) 'नि:श्वास गीतावली' मधील - चुंबता-हासता, वाहणे-पाहणे, जरी-तरी, पक्षिणी-यक्षिणी, रूपे-लपे, पातली-नाचली, यामिनी-चांदणी इत्यादी.

४) 'जुईची कळी' मधील धूर-पूर, साधा-बाधा, थोरी-गोरी, दोन-होन इत्यादी.

उदा. निळीनिळी रजनी : भोवती रूपेरी धूर:

तिने भरून सुरई वर्षेला सुधेचा पूर' (जुईची कळी पृ. क्र. ३९)

अशाप्रकारे यमक या कवितेमध्ये सर्वत्र साधलेले आपणास दिसतील.

२) क्रियापदाचा यमक म्हणून वापर :

क्रियापदाचा वापर वाक्यपूर्तीसाठी होतो. पण 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात कवीने क्रियापदाचा वापर यमक म्हणून सुध्दा केलेला दिसतो.

उदा. म्हणून गिरिजेचा संसार या कवितेचा येथे विचार करता येईल. होते-होते, नाही-नाही, येथील-होशील, ऐकलं-पाहयलं, पावलं-लावलं, लागलं-मागलं, थाटली-वाहिली, रंगली-भंगली, दावील-राहिल, होते-होते, नाही-नाही या क्रियापदाचा यमक म्हणून बऱ्याच ठिकाणी वापर झालेला दिसून येतो.

३) शेवटची दोन अक्षरे समासासारखी घेऊन यमक साधणारी काही उदा. घडा-चौघडा, जशी-मावशी, कळा-मोकळा, घातली-हृदयातली, गळा-मुलुखावेगळा, पाहयलं-राहयलं, विश्वोदरी-कालोदरी, सावल्या-सामावल्या, तरी-काहीतरी, साउली-माउली इत्यादी.

उदा.

'कसातरी रे, बारवेंत मी भरला माझा घडा;

परत निघालें तोंच वाजला देवळांत चौघडा.

(गिरिजेचा संसार,पृ.क्र. ११)

अशाप्रकारे यमके कवितेत येताना दिसतात. पहिल्या ओळीतील शेवटचा शब्द व दुसऱ्या ओळीतील शेवटचा शब्द यामध्ये प्रामुख्याने यमक साधलेले या सर्व कवितेत आपणाला दिसेल.

**ब) विशेषणाचा कलात्मक वापर :**

'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात कवी ना. घ. देशपांडे यांनी विशेषणाचा वापर कल्पकतेने केलेला आहे. त्यामुळे कवीमनातील भावभावना अधिक स्पष्टपणे व्यक्त होताना दिसतात. या काव्यसंग्रहातील महत्त्वाची काही विशेषणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

**कुशल कंचनी :** 'कुशल' या विशेषणामुळे 'कंचनी' या स्त्रीला अधिक महत्त्व प्राप्त

होते. कंचनी ही सामान्य स्त्री नाही तर ती कुशल (तरबेज) अशी स्त्री आहे. तिच्या गुणाचा उल्लेख या विशेषणामुळे होतो.

**पावसाळी लोचने :** 'पावसाळी' हे विशेषण मनातील भावविव्हल स्थिती दर्शविते.

निरभ्र आकाश : निरभ्र हे विशेषण, त्यामुळे आकाशाचा भाव व स्वरूप समजण्यास मदत होते.

**आसवाची फुले :** 'आसवांची' हे विशेषण मनाची भावस्थिती व्यक्त करते.

**अवखळ हरिण :** 'अवखळ' ह्या विशेषणातून चंचलपणा, उन्माद व्यक्त होतो.

**प्रफुल्ल यौवन :** 'प्रफुल्ल' हे विशेषण यौवनातील उसळता आवेश दर्शविते.

**आंधळी ममता :** 'आंधळी' हे विशेषण ममत्वाला अधिक गहिरे रूप प्रदान करते.

अशाप्रकारे विशेषण आशय स्पष्ट करण्यासाठी, विषयाची व्याप्ती वाढविण्यासाठी त्याचबरोबर नेमकेपणा आणण्यासाठी कवी कवितेत योजताना दिसतात. कवीने विशेषणाचा कलात्मक वापर वाखाणण्याजोगा आहे.

**क) उपमा-रूपके :**

उपमा अलंकारात एक वस्तू दुसऱ्या वस्तुसारखी आहे. असे वर्णन आलेले असते. सारखेपणा दाखविल्याशिवाय ती उपमा होत नाही. कवी ना. घ. देशपांडे यांनी आपल्या 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात अनेक उपमाचा वापर केल्याचे दिसते.

उदा.

'बावरले मी माळावरली चुकली हरिणी जशी'

(गिरिजेचा संसार पृ.क्र. ११)

'परी पाहुनी आज हे क्षोभ वाढे; कुठे लोपली माय माझी परी'

(नि:श्वास गीतावली पृ. क्र. २५)

वरील ओळीत गिरिजा व चुकलेली हरिण यांच्यात साम्य दर्शविले आहे. म्हणून येथे उपमा अलंकार होतो. याव्यतिरिक्त या काव्यसंग्रहात 'चंद्रबालेसवे चांदणी' (२९), 'गौरच

आहे जशी' (१४), 'राख रंगमहालातली' (१७) अशाप्रकारच्या अनेक उपमा कवी कवितेत योजताना दिसतो. उपमा अलंकारात व रूपक अलंकारात थोडी तफावत जाणवते. उपमेत एक वस्तू दुसऱ्या सारखी असल्याचे भासविले जाते. मात्र रूपकात त्या दोन ही वस्तू (उपमेय व उपमान) एकरूप असल्याचे स्पष्ट सांगितले जाते. 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील काही रूपके खालीलप्रमाणे पाहता येतील. उदा.

'पसंत कृष्ण तुम्ही मी गडे कशी राधा !'

(जुईची कळी पृ. क्र. ३९)

'बोलत नव्हते पण मी होते निर्मळ गंगाजळ'

(गिरिजेचा संसार पृ. क्र. २०)

या दोन्हीही उदाहरणांतून 'पसंत कृष्ण', 'सखी राधा', निर्मळ गंगाजळ ही रूपके समोर येतात. गिरिजेचे पावित्र्य हे निर्मळ गंगाजळच आहे. त्याचबरोबर प्रियकर हा कृष्णच व प्रेयसी ही राधाच आहे असे येथे ठसविले आहे. म्हणून येथे रूपक अलंकार घडून येतो. याव्यतिरिक्त या काव्यसंग्रहात इतर काही रूपके आल्याचे दिसतात.

ड) **स्वभावोक्ती अलंकार :**

''एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे, वस्तूचे त्यांच्या स्वाभाविक स्थितीचे किंवा हालचालीचे यथार्थ (हूबेहूब) पण वैशिष्ट्यपूर्ण वर्णन ज्यात येते. त्याला स्वभावोक्ती अलंकार असे म्हणतता.''[६] 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात 'गिरिजेचा संसार' या कवितेत गिरिजा या नायिकेने आपल्या सासऱ्याच्या स्वभावाचे, स्वाभाविक स्थितीचे केलेले वर्णन स्वभावोक्ती अलंकार ठरते. उदा.

'मामंजीच्या हाती होतं ऽ सोनीयाचं ऽ कडं ऽ;
गळ्यांत होती माळ शिरावर पागोटं ऽ तांबडं ऽ
देवाजीचं ऽ नाव जपावं ऽ; भजन करावं ऽ घरी;
रामप्रहारी उठून होते वाचत ज्ञानेश्वरी' (गिरिजेचा संसार, पृ.क्र. १७)

वरील ओळीतून गिरिजेच्या सासऱ्याचा स्वभाव व दररोजचा नित्यक्रम सांगितला आहे. सकाळी उठून ज्ञानेश्वरी वाचणे, देवाचा जप करणे यातून त्याच्या हालचालीचे वर्णन या कडव्यात आल्याचे दिसते.

इ) **प्रश्नालंकार :**

प्रश्नालंकारात प्रश्नाला अधिक महत्त्व प्राप्त झाले असते. कवितेत 'प्रश्नालंकार' आल्याचे फारच कमी कवितेमध्ये आपणाला आढळते. कवी ना. घ. देशपांडे आपल्या 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात प्रश्नालंकाराचा वापर करतात. त्यांनी कवितेत आणलेला प्रश्नालंकार इतर कवीपेक्षा वेगळेपणाची जाणीव निश्चित करून देतो. त्यांच्या या काव्यसंग्रहातील पहिल्या कवितेत कंचनी स्वत: वाटसरूला आपली करूण जीवन कहाणी सांगते. मात्र ती वाटसरूला प्रश्न करताना दिसत नाही. मात्र 'गिरिजेचा संसार' या कवितेत प्रश्नालंकाराचा वापर झाल्याचे दिसून येते. गिरिजा आपण सासरी आल्यानंतर आपल्या म्हाताऱ्या आईने कशा भाकरी भाजल्या असतील याबाबत पथिकाला प्रश्न करते. ती म्हणते-

'एकुलती मी पोर पोटची गेलेली सासरी
तिनंच ऽ बाई, कशा भाजल्या दोघांच्या भाकरी ?'

(गिरिजेचा संसार पृ. क्र. १९)

वरील ओळीत केवळ प्रश्नच आलेला नाही तर आईविषयीची आर्त भावना, आपुलकी व्यक्त झालेली दिसते. याचप्रमाणे 'नि:श्वास गीतावली' या कवितेत लहान मुलगा आईला, जगनिर्माणकर्त्या परमेश्वराला प्रश्न विचारून आपल्या मनातील आर्तता व्यक्त करताना दिसतो. त्याचबरोबर

'म्हणू खरी समजूत की अयोग्य आशंका ?
उदंड प्रीती जुनी ती संबंध गेली का ?' (जुईची कळी, पृ. क्र. ४०)

अशाप्रकारचा प्रश्नालंकार 'जुईची कळी' या कवितेमध्ये येतो. वरीलप्रमाणे प्रश्न विचारून प्रियकर प्रेयसीला तिच्या मनातील शंका विचारतो. येथे प्रश्नालंकारामुळे कवितेला

एक वेगळे वळण प्राप्त होऊन तिचे सौंदर्य अधिकाधिक खुलते. प्रश्नालंकार आल्याने कविता आशयघन बनते व रसिक वाचकास विचार करण्यास प्रवृत्त करते.

**ई) काही नवीन अलंकार :**

रा. अ. काळेले यांनी जुन्या अलंकाराबरोबरच काही नवीन अलंकार 'नवे अलंकार' या ग्रंथात सूचविले आहेत. कंचनी महाल या काव्यसंग्रहाचा अभ्यास करताना त्या अलंकाराचा येथे विचार करू या.

**आवर्तन अलंकार :**

''विवक्षित अर्थ अधिक ठसावा यासाठी एकच एक शद्ब किंवा एकच वाक्य पुन:पुन: घोळणे यांस आवर्तन अलंकार म्हणतात.''[७] येथे अर्थामध्ये आधीक्य आणण्याच्या कामी पुनरावृत्ति उपकारक ठरते. जेथे पुनरावृत्ती काव्यार्थ्यास परिपोषक होत असेल तेथे हा अलंकार मानावा. आवर्तन अलंकाराचे शद्बावर्तन व वाक्यावर्तन असे दोन प्रकार पडतात. 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात शद्बावर्तन अलंकार आल्याचे दिसते.

उदा. शद्बावर्तन :

'तुझ्यावीण ही शून्यशी सौख्यभाषा, पहा, शून्य सारी यशाची वने;
तुझ्यावीण ही शून्य आशा मनाची; तुझ्यावीण हे शून्यसे राहणे;'

(नि:श्वास गीतावली, पृ.क्र. २८)

अशाप्रकारे 'नि:श्वास गीतावली' या कवितेत 'तुझ्यावीण' हा शद्ब पुन्हा पुन्हा येऊन अर्थामध्ये अधिक गहनता येते.

**उ) प्रतिमाविचार :**

काव्यातील जाणीव तत्काळ रसिकांच्या मनात रूजविण्याचे कार्य प्रतिमाद्वारे होते. दोन वस्तूची, दोन अनुभवाची एकात्मक प्रतिमेत साधलेली असते. कवी ना. घ. देशपांडे आपल्या 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात अनेक प्रतिमाचा वापर अचूकपणे करतात. रंगप्रतिमेचा वापर कवी सहजपणे करताना येथे दिसतात.

उदा. 'ऐकले भाषण, परंतु नव्हती कुणाची कुठेच खूण;

विस्मय भीतीने पथिक बनला पांढरा चांदण्याहून'

वरील कडव्यात 'पांढरा चांदण्याहून' ही रंगप्रतिमा आलेली आहे. येथे चांदण्याहून पांढरा पडणे म्हणजे भीतीने पूर्णत: गारठून पडणे. त्या पथिकाच्या मनातील भीतीला 'पांढरा चांदण्याहून' ही रंगप्रतिमा कवी योजताना दिसतात. याव्यतिरिक्त 'नीलार्द्र हवा', 'पिवळी रात्र', 'काजळी पंख', 'निळ्याप्रांगणी', 'पिवळा निर्जन माळ', 'निळी निळी रजनी', ढवळा लवलवता फुल्वर, हिरवे केळीचे फळ, अशा नवनवीन प्रतिमा कवी आपल्या कवितेत आणताना दिसतात.

त्याचबरोबर त्यांच्या या काव्यसंग्रहात आलेल्या दृकप्रतिमा विशेष वाटतात. लाचार डोळे (पृ.क्र. ५), मिणमिण दिवटी (पृ.क्र. १३), झिमझिमता मुरग (पृ.क्र. १७), अशाप्रकारच्या दृक प्रतिमा त्यांच्या या काव्यसंग्रहात आल्याचे दिसतात.

उदा. 'चिडून बोटं ऽ तिनं ऽ मोडली कडकड माझ्यावर;

मिणमिण दिवटी तेवत होती; उदास होतं ऽ घर;' (गिरिजेचा संसार पृ. क्र. १३)

वरील कडव्यात 'मिणमिण दिवटी' ही दृक प्रतिमा असल्याचे दिसते. वरील ओळी वाचताना 'मिणमिण दिवटी' आपल्या डोळ्यासमोर तेवत असल्याचे दृश्य साकार होते. म्हणून ही दृकप्रतिमा ठरते.

'अनेक आरत्यांमधून फाकला तुपाचा सुगंधी धूर;

सगळ्यांवरती चढला आगळा कोवळा माझाच सूर'

(कंचनीचा महाल, पृ. क्र ५)

येथे 'सुगंधी धूर' यांतून गंधप्रतिमा व्यक्त होते. 'सुगंधी धूर' या प्रतिमेने वातावरण गंधमय बनविल्याचे दिसते. याव्यतिरिक्त या काव्यसंग्रहात 'सुगंधी वाट' (२८), सुगंधी वारे (५), सुगंधपुर्ण कळी (४०) अशा गंधप्रतिमा आलेल्या आहेत. ज्या प्रतिमेत निसर्गाचे रूप व त्याचबरोबर भौतिक रूप यांची सांगड घातली जाते तेव्हा नैसर्गिक व भौतिक प्रतिमा निर्माण होते.

'किती गाइली दीन गाणी तिला मी, किती वाहिली आसवांची फुले'

(कंचनीचा महाल,पृ. क्र. ३२)

वरील ओळीत 'आसवांची फुले' ही नैसर्गिक व भौतिक प्रतिमा ठरते. 'आसवांची फुले' या प्रतिमेत 'आसवांची' या शद्बात भौतिक रूप दिसते. तर 'फुले' हे नैसर्गिक रूप आल्याचे दिसते. याव्यतिरिक्त या कवितेत 'कोमल कुसुमाहून' (पृ.क्र.७), 'जलार्द्र कलिका' (पृ.क्र.४०), 'आसवांची झरी' (पृ.क्र.२८), 'क्षीणशी चांदणी' (पृ.क्र.२९) इत्यादी नैसर्गिक व भौतिक प्रतिमा आल्याचे दिसतात.

अमूर्तिकरण प्रतिमेत निसर्ग मनुष्याप्रमाणे वर्तन करताना दिसतो. निसर्गाचा मानवी भावभावनांशी, त्याच्या वर्तनाशी संबंध जुळविला जातो. या काव्यसंग्रहात 'हासले पांढरे चांदणे', 'कामुक डोळे', 'निजली नगरी', 'उदास घर', उदासीन फुले (पृ.क्र.२७), मुक्त वृक्ष (पृ.क्र.३९), मुग्ध निशा (पृ.क्र.३९) अशाप्रकारच्या अनेक अमूर्तिकरण प्रतिमा आल्याचे दिसतात.

उदा. 'दक्षिण बाजूच्या गोलार्ध भूमीच्या पल्याड आभाळाखाली

निजली नगरी मिटून नयनें ओढून ओढणी काळी' (कंचनीचा महाल, पृ.क्र. ६)

'निजली नगरी' या अमूर्तिकरण प्रतिमेतून मनुष्याच्या झोपण्याच्या क्रियेशी साम्य दर्शविले आहे. याचबरोबर 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात प्राणी प्रतिमाची रेलचेल असल्याचे दिसते. 'अवखळ हरिणी' (पृ.क्र.१८), 'चुकली हरिणी (पृ.क्र.११), 'पाखरू (पृ.क्र.१९), 'हरिणीचे पाडस' (पृ.क्र.२०), 'वासरू (पृ.क्र.१९), अनोळखी पाखरा (पृ.क्र.२२), 'हुरहुरली सांळुखी' (पृ.क्र.१९) अशा प्रकारच्या प्राणी प्रतिमा आल्याचे दिसतात.

'हुरहुरली साळुंकी, नाही दिसलं ऽ पण पाखरूं;

हंबरली लय् गाय मिळालं ऽ नाही पण वासरूं' (गिरिजेचा संसार,पृ.क्र. १९)

वरील कडव्यात 'हुरहुरली साळुंकी' 'हंबरली गाय, 'वासरू', 'पाखरू' या प्राणीप्रतिमेतून आईची मुलांविषयीची ओढ दिसून येते. अशाचप्रकारे अनेक ठिकाणी कवी मनातील प्रेम, ओढ, तळमळ, धुसमट व्यक्त करताना प्राणी प्रतिमेचा चपलख वापर करताना दिसतो. नाद

प्रतिमेत निर्माण झालेल्या आवाजाला महत्त्व दिले जाते. होणाऱ्या आवाजातून नाद प्रतिमा ठरविली जाते. या काव्यसंग्रहात मंदशी पावले (पृ.क्र.२६), मंद संगीते (पृ.क्र.३९), खळखळ पाणी (पृ.क्र.१५) अशाप्रकारच्या नाद प्रतिमा कवी उत्कटपणे योजताना दिसतो.

**ऊ) इतर भाषेतील शद्बांची योजना :**

कवी ना. घ. यांच्या 'कंचनीच्या महाल' ह्या काव्यसंग्रहात संस्कृत भाषेतील शद्बाचा व ग्रामीण बोलीचा कलात्मक वापर केल्याचे दिसते. कवी लहानपणी वडिलांकडून भक्तिपर काव्यरचना ऐकत असत. त्याचाच परिणाम यांच्याही काव्यात संस्कृतप्रचुर शद्बाचा काहिसा समावेश झाला असे म्हणता येईल. त्याचबरोबर कवी ग्रामीण भागात वास्तव्यास असल्यामुळे ग्रामीण बोलीतील शद्बाचा ते कवितेत वापर करतात. वऱ्हाडी बोलीतील काही शद्ब कवीच्या कवितेत जसेच्या तसे आलेले दिसतात.

'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात गणिका (पृ.क्र.३), यामिनी (पृ.क्र.३), मानस (पृ.क्र.७), चंपक (पृ.क्र.७), मृत्तिका (पृ.क्र.२८), रजनी (पृ.क्र.३९), ध्वंसन (पृ.क्र.३२), अनुकार (पृ.क्र.३९), नासिका (पृ.क्र.४२), कपोला (पृ.क्र.२७), पुष्प (पृ.क्र.७), दीप (पृ.क्र.२९), बालिश (पृ.क्र.१४), शर्वरी (पृ.क्र.२४) अशा अनेक संस्कृत प्रचूर शब्दाचा वापर कवी कवितेतील वातावरण प्रसन्नमय होण्यासाठी तसेच कवितेला चकाकी देण्यासाठी करतांना दिसतो.

त्याचबरोबर कवी ना. घ. देशपांडे 'भकास' (पृ.क्र.७), सय (पृ.क्र.१६), 'सरावण' (पृ.क्र.१५), 'रावजी' (पृ.क्र.१३), 'बाळीला' (पृ.क्र.१५), 'दमनी' (पृ.क्र.१५), मा-बापाच्या (पृ.क्र.१२), घातुक (पृ.क्र.२०), सहावास (पृ.क्र.४२), नूर (पृ.क्र.३९), लई (पृ.क्र.१२), चंदिर (पृ.क्र.३२), भिवई (पृ.क्र.४०), पुनव (पृ.क्र.८), पल्याड (पृ.क्र.६) मुलुखायेगळा (पृ.क्र.१६), दावील (पृ.क्र.४१) अशा कितीतरी ग्रामीण बोलीभाषेतील शद्बांचा समावेश आपल्या कवितेत करतात. या काव्यसंग्रहात आलेले ग्रामीण शद्ब विदर्भातील विशेषत: वऱ्हाडी बोलीतून आल्याचे दिसते. त्यामुळे शद्बांतील वेगळेपणा येथे विशेषत: जाणवतांना

आपणास दिसतो. सेंदूरजन, मेहकर या आडवळणीच्या वस्तीत कवीचे वास्तव्य असल्याने व त्याच भागात त्याचे शिक्षण झाल्याने त्यांच्या काव्यात ग्रामीण बोलीभाषा सहजतेने येते.

**ओ) रसाभिव्यक्ती :**

माणसाच्या मनात राग, लोभ, हर्ष, खेद, उल्हास, विस्मय, आनंद अशा अनेक भावभावनांचा वास असतो. कोणताही साहित्यिक यापासून अलिप्त राहू शकत नाही आणि भावभावनांचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात पडल्याशिवाय राहत नाही. तेव्हा कवी ना. घ. देशपांडे यांच्या कंचनीचा महाल या काव्यसंग्रहातून या भावनांचा परिपोष होतो. या भावनातूनच रसाची निर्मिती होते. या काव्यसंग्रहातील कवितांमधून शृंगार, वीर, करूण, अद्भूत, भयानक हे रस निर्माण झालेले जाणवतात.

उदा. 'गिरिजे गिरिजे', एकच गाणं ऽ ऐकावं ऽ वाटलं
शरदामधलं ऽ भुरळ चांदणं ऽ मनात या थाटलं ऽ
बोलावसं लई वाटलं ऽ ओढ लई लागली;
मनांतली पण मैना माझी ओठावर लाजली'

(गिरिजेचा संसार पृ.क्र. १२)

या उदाहरणातून कवी शृंगाररसाची निर्मिती करतो असे दिसते. दोघांमधील प्रेमभावना, त्यांच्यामध्ये असलेले शारीरिक आकर्षण यातून शृंगार प्रतित होतो.

करुण रस हृदयद्रावक अशा गोष्टींच्या वर्णनातून निर्माण होतो. 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील 'निःश्वास गीतावली' ही कविता करूण रसाचे उत्तम उदाहरण म्हणता येईल.

'पहा पोरके पोर माते तुझे हे : सदा बावरा जीव 'माता' वदे'

(निःश्वास गीतावली पृ.क्र. २६)

या ओळीतून मुलाची कारूण्यता व्यक्त होतांना जाणवते. याचबरोबर

'कसा एकटा सांग, राहूं इथे मी ? किती चालले आर्त आक्रंदन ?

(निःश्वास गीतावली पृ.क्र. २७)

या प्रश्नार्थक ओळीतून आईविना पोरक्या असलेल्या मुलांच्या मनातील वेदना, शोक प्रकट होताना दिसतो. त्याचे आईविना असलेले पोरकेपण करूण रसाच्या निर्मितीत अधिकाधिक भर घालते.

भिती या भावनेतून भयानक या रसाची निर्मिती होते युध्द, मृत्यू, खून, सूड, राक्षस, स्मशान इत्यादीच्या वर्णनातून हा रस निर्माण होतो. गोविंदाग्रजाचे 'स्मशानातले गाणे' हे भयानक या रसाचे उदाहरण सांगता येईल. प्रस्तुत काव्यसंग्रहातील 'कंचनीचा महाल' या कवितेत भयानक या रसाची निर्मिती झालेली जाणवते.

'अशीच होती रे, नि:शद्व मधुर ती रात्र राजसवाणी;
असेच खोलात वहात होते रे, या पैनगंगेचे पाणी !''
ऐकले भाषण, परंतु नव्हती कुणाची कुठेच खूण;
विस्मय भीतीने पथिक बनला पांढरा चांदण्याहून.'

(कंचनीचा महाल, पृ.क्र. ३)

नि:शद्व अशी रात्र, खोलात वाहणारे पैनगंगेचे पाणी, काळोख्या रात्री कुणाचे भाष्य ऐकू येणे यातून भीतीमय वातावरण निर्माण होते व या वातावरणातून भयानक या रसाची उत्पत्ती होते. असे आपल्याला म्हणता येईल.

अद्‌भूतता हा रसाचा स्थायीभाव हे. परीच्या कथा, अरेबियन नाइट्स, अलिबाबा व चाळीस चोर अशा आश्चर्यकारक, विस्मय गोष्टीच्या वर्णनांतून अद्‌भूत ह्या रसाची निर्मिती होते.

'क्षितिजापासून क्षितिजापर्यंतच आकाश कंपीत झाले'

(कंचनीचा महाल, पृ.क्र. ७)

त्याचबरोबर,

'पुनव येताच वासनामय मी दगडामधून येते;
महालाभोवती चांदण्याखालती तेच ते फेर मी घेते' (कंचनीचा महाल, पृ.क्र. ८)

वरील दोन्हीही कडव्यातून अद्भूतता व्यक्त होताना दिसते. क्षितिजापासून क्षितिजापर्यंत आकाश कंपीत होणे, महालाभोवती फेर घेणे, येरझारा मारणे यातून अद्भूत अशा वातावरणाची निर्मिती होते. रसिक वाचक ह्या ओळीवाचून विस्मयीत होतो.

## ६.४ प्रायोगिक रचना :

कवी ना. घ. देशपांडे यांच्या 'कंचनीचा महाल' काव्यसंग्रहातील रचनातंत्राचा विचार केल्यास त्यांनी नवप्रयोग केल्याचे दिसून येते. त्याबाबत स्वतः कवी आपली संमती दर्शवितात. मराठीत गद्याच्या लेखनात व उच्चारणात फरक पडताना दिसतो. गद्यातील उतारे, वाक्ये वाचताना शब्दातील अंत्य 'अ' उच्चार केला जातो. कवीने यासंबंधीत विचार करून गद्याप्रमाणे कवितेत देखील अंत्य 'अ' चा उच्चार न करता कवितेची रचना केली. त्यांची 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील 'जुईची कळी' ही संपूर्ण कविता या विचारावर आधारित लिहिली आहे. कविता ही उच्चाराच्या आधारावर असावी असे त्यांचे मत आहे. हा त्यांनी काव्यासंबंधीचा नवा प्रयोग केला. मराठी गद्याच्या लेखनाप्रमाणे त्यांनी कवितेत लघुगुरू मानून कवितेची रचना केली व त्यानुसार त्यांची कविता तयार झाली.

उदा. 'जुईवरून सहजच टाकली गडे तूं चूळ
जलार्द्र कलिकेने अन् दिली सुखाची हूल.'

ही ओळ खालीलप्रमाणे वाचावयाची आहे.

'जुईवरून सहज<u>चु</u> टाकली गडे तूं <u>चूळु</u>
जलार्द्र कलिकेने अन् दिली सुखाची <u>हूलु</u>

(जुईची कळी,पृ.क्र. ४०)

याप्रमाणे उच्चाराप्रमाणे ही सर्व कविता वाचावी अशी अपेक्षा कवी ना. घ. देशपांडे करतात. या प्रायोगिक रचनेला त्या काळात चालना मिळाली नाही. म्हणून नवीनता काव्यात आज रूढ झालेली दिसत नाही.

त्याचबरोबर 'कंचनीचा महाल' मध्ये लघु-गुरू भेदातीत नवीन अक्षरछंद वापरून दहा ओळीच्या एकेका करण्याची रचना केली आहे. शेवटच्या दोन ओळीत कलाटणी किंवा तीव्रोद्रेक जाणवेल असे आहे. 'नि:श्वास गीतावली' ही कविता सुमंदारमाला वृत्तांत लिहिली आहे. ही विलापिका कवीने युरोपीय संकेतानुसार न लिहिता देशीय परंपरेशी नाते सांगणारी लिहिली आहे. कारण कवीच्या मतानुसार ती आपल्या जीवनपरंपरेत व इतिहासात ते बसत नाही. त्यांनी 'गिरिजेचा संसार' या दीर्घकवितेसाठी 'जाती' वृत्त वापरले आहे व तेच वृत्त कवीला त्या कवितेसाठी योग्य वाटते.

अशाप्रकारचे नाविन्य कवी ना. घ. देशपांडे यांनी काव्यात आणण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

## ६.५ कथात्मकता :

गोष्टी हा व्यक्तीचा सर्वात आवडीचा प्रकार आहे. पुरातन काळापासून आजपर्यंत एक पिढी दुसऱ्या पिढीला कथा ऐकवून ती संक्रमीत करताना दिसते. त्यामुळे कालांतर घडत असले तरी कथा मात्र जिवंतच राहत असते. अशी कथा जेव्हा काव्यातून अवतरते.तेव्हा त्याला 'कथाकाव्य' म्हणतात.

'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात आलेल्या चारही कविता या कथात्मक स्वरूपाच्या आहेत. 'कंचनीचा महाल' ही पहिली कविता कंचनी नावाच्या नर्तिकेची (कलावंतीणीची) जीवनकहाणी आहे. दुसरी कविता 'गिरिजेचा संसार' यामध्ये 'गिरिजा' या तरूणीचा संसार काळाच्या ओघात कसा उद्‌धवस्त झाला हे सांगितलेले आहे. 'नि:श्वास गीतावली' या कवितेत कवीने आईच्या प्रेमाची महती गायिली आहे. आई-मुलाचे नाते उत्कटपणे चित्रित केले आहे. तर 'जुईची कळी' मध्ये प्रियकर-प्रेयसी यांच्यातील प्रेमाराधना व्यक्त केली आहे.

'कंचनीचा महाल' ही पौराणिक स्वरूपाची दंतकथा आहे. कथेत ज्याप्रमाणे कमी पात्रे, कमी प्रसंग व एकच एक गोष्ट रंगविलेली असते त्याचप्रमाणे या कथाकाव्यात देखील कमी पात्राच्या आधारे, कमी प्रसंगाद्वारे एकच एक गोष्ट सांगितलेली आहे. 'कंचनीचा महाल'

या कवितेत 'कंचनी' आपली करूण कहाणी वाटसरूला निवेदन करून सांगते. येथे वाटसरू श्रोत्याची भूमिका बजावतो. 'गिरिजेचा संसार' या कथाकाव्यात गिरिजा स्वत: आपली सांसारिक जीवनकथा पथिकासमोर मांडते. 'नि:श्वास गीतावली' मध्ये कवी स्वत: मूल या नात्याने निवेदकाची भूमिका पार पाडतो.

'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात आलेल्या चारही कवितांमध्ये ओघवती भाषा, प्रासादिकता, मार्मिक शद्बरचना आलेली आहे. अलंकाराचा कवी वापर करतो मात्र त्यामुळे कविता अधिक क्लिष्ट न होता प्रासादिकच बनते. प्रत्येक कवितेतील प्रसंग एका पाठोपाठ एक येतात. त्यामुळे त्यात खंड न पडता वाचकांचा निरस होत नाही. कवी ना. घ. देशपांडे यांचे 'कंचनीचा महाल' हे एक सुंदर कथाकाव्य बनले आहे. प्रारंभापासून शेवटपर्यंत ते उत्तम बनले आहे. कथाकाव्यात पाहिजे असलेली जी सलगता असते ती या काव्यसंग्रहातील प्रत्येक कवितेत आली आहे. याबाबत अशाचप्रकारचे अनुवादक श्री. रं. कुलकर्णी यांचे मत दिसून देते, ते म्हणतात -

''कथाकाव्यात एखादा-दुसरा चरणच चांगला असून भागत नाही. साखळीची एखादीच कडी निराळी असली की, साखळीची शोभा जाते. तोच प्रकार कथाकाव्याचा असतो. या काव्यप्रकारात सर्व चरणांना सारखेच महत्व असते.''[८]

याचबरोबर काव्यातून आलेल्या कथेबाबत नागनाथ कोत्तापल्ले यांचे मत योग्य वाटते. ते म्हणतात -

''ज्या कवितेत कथात्मकतेचे धागे आहेत त्याच कविता ह्या अधिक प्रभावी आणि प्रत्ययकारी झालेल्या आहेत.''[९] म्हणजे काव्यात कथा येणे हे उत्तमच ठरते. 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात आलेल्या कथा ह्या कवीने गावातल्या मंडळीकडून व त्यांच्या आजीकडून ऐकल्या असून त्या दंतकथा आहेत. 'गिरिजेचा संसार', 'नि:श्वास गीतावली' या कवितांना वास्तवतेचा आधार आहे. बऱ्याच काळपर्यंत मनात घोळत असलेल्या विषयांचे रूपांतर या काव्यात झालेले दिसते. या काव्यसंग्रहात कथा व काव्य एकजीव झालेले आढळतात. हे कवीचे विशेष म्हणायला हवे.

## ०७. समारोप :

अशाप्रकारे कवी ना. घ. देशपांडे यांचा कथाकाव्य स्वरूपातून शद्बबद्ध झालेला 'कंचनीचा महाल' हा काव्यसंग्रह रसिक वाचकाच्या मनाचा ठाव घेणारा आहे. दीर्घ काव्यातून एखादा प्रसंग रेखाटण्यात कवी यशस्वी झाले आहेत. 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील भाषा अत्यंत सोपी व जवळ जवळ गद्याला स्पर्श करणारी आहे. या कथाकाव्यांतील कथानक हे चित्ताकर्षक असल्याने वाचकाला रिझवत राहते. काव्यात आलेल्या उपमा, रूपके, प्रतिमा, रसाभिव्यक्ती, प्रायोगिक रचना यामुळे काव्यसंग्रहाला परिपूर्णता आली आहे. असे म्हणावयास हरकत नाही.

# संदर्भग्रंथ सूची


१) महानोर ना. धों. 'ऐसी कळवळ्याची जाती'
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९७.
पृ.क्र. ८९

२) देशपांडे ना. घ. 'प्रस्तावना'
'कंचनीचा महाल' काव्यसंग्रह
मौज प्रकाशन, मुंबई प्र.आ. १९९६
पृ.क्र. ६

३) महानोर ना. धों. 'ऐसी कळवळ्याची जाती'
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९७
पृ.क्र. ८८

४) देशमुख उषा लेख - 'मराठी गूढकविता : केशवसूत व गोविंदाग्रज'
पुस्तक 'चांफा ते फुलवात'
विजय प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००६.
पृ.क्र. १५९

५) चित्तमपल्ली मारूती लेख - 'दिवा आणि दिवारू'
'जंगलाचं देणं' सातवी आवृत्ती - २००२
साहित्य प्रसार केंद्र सीताबर्डी, नागपूर १२
पृ.क्र. १२८

६) वाळंबे, मो. रा. 'सुगम मराठी व्याकरण लेखन'
नितिन प्रकाशन पुणे - ३०
नविन सुधारित आवृत्ती, जुन २००७.
पृ.क्र. १७९

| | | |
|---|---|---|
| ७) | काळेले रा. अ. | 'नवे अलंकार' |
| | | मनोहर ग्रंथमाला, पुणे, प्र.आ. १९६३ |
| | | पृ. क्र. ८४ |
| ८) | कुलकर्णी श्री. रं. | 'काव्य आणि कविता', |
| | (अनुवादक) | प्रकाशक - साहित्य अकादेमी नवी दिल्ली |
| | | नोव्हें. १९७१ |
| | | पृ.क्र. १६२ |
| ९) | कोत्तापल्ले नागनाथ | लेख - 'दोनुली आणि वा. रा. कांत यांची कविता' |
| | | मराठी कविता : आकलन आणि आस्वाद, |
| | | स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २००१ |
| | | पृ.क्र. १३२ |